cmyk

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com

नवी दिशा... नवे विचार.....

email:rajyaloktantra75@gmail.com

● पुणे ● अहिल्यानगर ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२४५ | शुक्रवार दि.०२ जानेवारी २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### सद्या कार्यकर्त्यांचा भ्रमनिरास !

राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीच्या निमित्ताने उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी राज्यात सर्वत्र ज्या प्रकारचा आक्रोश पहायला मिळाला ते पाहता आपली लोकशाही परिपक्व झाली आहे का अजूनही बाल्यावस्थेत आहे याबाबत शंका यावी. आपण ज्या पक्षाचे दीर्घकाळ कार्यकर्ते होतो

# कापूस आयातीवर ११ टक्के शुल्क लागू

## शेतकऱ्यांना दिलासा, दरात वाढ होण्याची शक्यता

पुणे | प्रतिनिधी

**कापूस आयातीवर गुरुवारपासून (दि.१) ११ टक्के आयातशुल्क लागू झाले आहे. याचा आधार बाजाराला मिळाला असून, काही ठिकाणी कापसाच्या दरात १०० ते २०० रुपयांपर्यंत सुधारणा झाली आहे. कापसाला प्रति क्विंटल ७७०० ते ८ हजार रुपयांच्या दरम्यान दर मिळाला. सरकारने आयातविषयक धोरण कायम ठेवले तर दरात आणखी सुधारणा होऊ शकते, असा अंदाज अभ्यासकांनी व्यक्त केला.**



सरकारने ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत कापूस आयातीवरील ११ टक्के शुल्क काढले होते. अमेरिकेने भारताच्या कापड आयातीवर ५० टक्के शुल्क लागू केल्याने उद्योगांनी कापूस आयातीवरील शुल्क काढण्याची मागणी केली होती. त्यानुसार केंद्र सरकारने १९ ऑगस्ट रोजी ३० सप्टेंबरपर्यंत ११ टक्के शुल्क काढले होते. त्यानंतर मुदतवाढ देऊन ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत शुल्क मुक्त आयातीला परवानगी दिली होती. त्याची मुदत आता संपली आहे. सरकारनेही मुदतवाढ देण्याविषयी कोणतीही अधिसूचना काढलेली नाही. त्यामुळे १ जानेवारीपासून आयात कापूस आयातीवर ११ टक्के शुल्क लागू झाले आहे. सरकारने ३१ डिसेंबरनंतरही कापसाची शुल्कमुक्त आयात कायम ठेवावी, अशी मागणी उद्योगांनी केली होती.

### आतापर्यंत ६२ लाख गाठी कापूस खरेदी

देशात आतापर्यंत कापसाचा भाव हमीभावापेक्षा कमी होता. त्यामुळे सीसीआयची खरेदी वाढली आहे. सीसीआयने आतापर्यंत जवळपास ६२ लाख गाठी कापूस खरेदी केला आहे. सीसीआयच्या खरेदीमुळे खुल्या बाजारातील दर सुधारण्यास मदत झाली आहे. सीसीआय यंदाही १०० लाख गाठी कापूस खरेदी करेल, असा अंदाज आहे.

शुल्कमुक्त आयातीला मुदतवाढ द्या, आयात शुल्क कायमस्वरुपी काढून टाका, अशी मागणी कॉटन असोसिएशन ऑफ इंडिया आणि तमिळनाडू स्पिनिंग मिल्स असोसिएशनने केली होती. मात्र सरकारने आतापर्यंत उद्योगांच्या या मागणीवर कोणताही निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे आयात शुल्क लागू झाले आहे. कापूस आयातीवर ११ टक्के शुल्क लागू झाल्याचा परिणाम लगेच बाजारावर दिसला आहे. देशातील बहुतांशी बाजारात ▶▶ पान २ वर

# नाट्यगृह नूतनीकरणासाठी आठ कोटी ; मार्चपर्यंत बीड ते परळी रेल्वे मार्ग पूर्ण-अजित पवार

बीड | प्रतिनिधी

**बीड शहराच्या वैभवात भर घालणाऱ्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाची दुरावस्था पाहता त्याचे नूतनीकरण करण्याची मागणी होती या नाट्यगृहाच्या नूतनीकरणासाठी आठ कोटी १९ लाख ७० हजार रुपयांच्या कामास मंजुरी दिली असल्याचे पत्र भर सभेत दाखवत मी कामाचा माणूस आहे म्हणत येत्या तीन महिन्यात म्हणजे मार्चपर्यंत बीड ते परळी हा रेल्वे मार्ग देखील पूर्ण होईल, असे आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.**



बीड येथील छत्रपती संभाजी महाराज क्रीडा संकुलावर झालेल्या आदर्श शिक्षक पुरस्कार व इतर विविध विकास कामाच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना पालकमंत्री अजित पवार म्हणाले की, मी कामाचा माणूस आहे हे तुम्हाला दिसलेच असेल. बीडकर यांची गेल्या अनेक वर्षांपासूनची नाट्यगृह नूतनीकरणाची मागणी होती. मी बीडकडे येत असतानाच सचिवाला फोन करून ही कल्पना दिली आणि बीड पर्यंत आलो तर या कामाला आठ कोटी एकोणीस लाख ७० हजार रुपयाची मंजुरी मिळाल्याचे पत्र माझ्या व्हाट्सअॅप ▶▶ पान २ वर

### आमचं बरं चाललंय उगाच चर्चा नको

आजच्या कार्यक्रमाला व्यासपीठावर सर्वच पक्षाचे नेते आहेत काल धनंजय मुंडे यांचा फोन आला होता कार्यक्रमाची तारीख निश्चित नसल्याने मी आज आलो पण पत्रकार उगाच चर्चा करतील धनंजय मुंडे नाहीत पंकजा मुंडे नाहीत नमिता मुंद्रा नाहीत असं काही नाही आम्ही सगळे बरोबर आहोत आणि आमचं बरं चाललंय असा मिस्कील टोला पत्रकारांना त्यांनी लगावला



## अन् खासदार सोनवणे यांची दक्षिणा अजितदादांनी नाकारली!

बीड | प्रतिनिधी

१४ कोटी ९८ लाख ७९ हजार रुपये किंमतीच्या सहकार भावनाच्या चार मजली ईमारत कामाचे भूमिपूजन राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमादरम्यान विधिवत पूजेनंतर देण्यात येणारी दक्षिणा स्वीय सहायकाकडून लवकर आली नाही. त्याचवेळी ती रक्कम खा. बजरंग सोनवणे यांनी हस्ते परहस्ते पोहचवली. मात्र पवारांनी ती दक्षिणा नाकारल्याचे चित्र यावेळी दिसून आले.

गुरूवारी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते शहरातील जालना रोडवर असलेल्या नियोजित सहकार भवनाचे भूमिपूजन करण्यात आले. या कार्यक्रमाला राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील देखील उपस्थित होते. भूमिपूजन विधिवत ▶▶ पान २ वर

# भारताच्या पहिल्या बुलेट ट्रेनचा मुहूर्त ठरला !

## मुंबई–अहमदाबाद अंतर केवळ २ तासात पूर्ण होणार;१५ ऑगस्ट २०२७ रोजी रूळावरून धावणार

नवी दिल्ली | वृत्तसंस्था

भारतीय रेल्वेच्या इतिहासात मैलाचा दगड ठरणाऱ्या बुलेट ट्रेन प्रकल्पाची प्रतीक्षा आता संपली आहे. केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी गुरुवारी एका विशेष कार्यक्रमात देशातील पहिल्या बुलेट ट्रेनच्या व्यावसायिक प्रवासाची तारीख जाहीर केली. येत्या १५ ऑगस्ट २०२७ रोजी भारताची पहिली बुलेट ट्रेन रुळावरून धावेल, अशी अधिकृत घोषणा त्यांनी मीडियाशी संवाद साधताना केली. अहमदाबाद–मुंबई बुलेट ट्रेन प्रकल्पाचा हा पहिला टप्पा असून, सुरुवातीला ही सेवा गुजरातच्या सूरत ते बिलिमोरा




या दोन स्थानकांदरम्यान सुरू होणार आहे. ▶▶ पान २ वर

# या वर्षात राज्यसभेच्या ७२ जागांसाठी रणधुमाळी!

## अनेक दिग्गजांचे भवितव्य धोक्यात, राज्यसभेचे गणित बदलणार ?

पुणे | प्रतिनिधी

२०२६ मध्ये राज्यसभेच्या तब्बल ७२ जागा रिक्त होणार आहेत. या निवडणुकांचा थेट परिणाम केंद्रातील राजकारणावर, सत्ताधारी एनडीएची ताकद आणि विरोधकांची रणनीती यावर होणार आहे. सध्या राज्यांच्या विधानसभांची स्थिती पाहता, भाजप आणि एनडीएची राज्यसभेतील संख्या वाढण्याची



दाट शक्यता आहे, तर काँग्रेस आणि विरोधी पक्षांच्या अडचणी वाढू शकतात.

राज्यसभेतील बहुमताचे गणित बदलणार असले, तरी एनडीए आपली पकड अधिक मजबूत करणार आहे. यामुळे केंद्र ▶▶ पान २ वर

# राज्यभरात १३ नगरसेवक बिनविरोध

मुंबई | प्रतिनिधी

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत भाजप–शिवसेना शिंदे गटाच्या महायुतीने मतदानापूर्वीच विजयाचा गुलाल उधळण्यास सुरुवात केली आहे. भाजपचे



५ आणि शिवसेना शिंदे गटाचे ४ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. त्यामुळे १२२ सदस्य संख्या असलेल्या कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत सत्तास्थापनेसाठी आवश्यक असलेल्या ६२ जगांपासून महायुती आता केवळ ५३ जागा दूर आहे. त्यामुळे भाजप, शिवसेनेत जल्लोषाचे वातावरण पाहायला मिळत आहे. ▶▶ पान २ वर

# खा.सोनवणे यांचा साखर कारखाना शेतकऱ्यांनी बंद पाडला



बार्शी | प्रतिनिधी

बीडचे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे खासदार बजरंग सोनवणे यांचा येडेश्वरी सहकारी साखर कारखाना युनिट दोन हे बार्शी जिल्हा सोलापूर या ठिकाणी सुरू आहे ऊसाला भाव दिला जात नसल्याने आणि उसाच्या मापात काटा मारला जात ▶▶ पान २ वर

# लाडक्या बहिणींचा हिरमोड!

## वर्षाअखेरीस केवळ नोव्हेंबरचा हफ्ता जमा, डिसेंबर–जानेवारी महिन्यांच्या हप्त्यांबाबत संभ्रम

पुणे | प्रतिनिधी

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांच्या खात्यात बुधवारी नोव्हेंबर महिन्याचा १५०० रुपयांचा हफ्ता जमा झाला. डिसेंबरअखेर असल्याने थकीत तीन महिन्यांचे एकत्रित ४५०० रुपये मिळतील, अशी आशा महिलांना होती; मात्र प्रत्यक्षात केवळ एकच हफ्ता आल्याने अनेकींचा अपेक्षाभंग झाला. डिसेंबर आणि जानेवारी महिन्यांच्या प्रलंबित हप्त्यांबाबत अद्यापही संभ्रम कायम आहे.

मागील तीन महिन्यांपासून प्रतीक्षेत असलेल्या महिलांना वर्षअखेरीस ३००० ते ४५०० रुपये एकत्रित मिळतील अशी अपेक्षा होती, मात्र प्रत्यक्षात केवळ नोव्हेंबरचा एकच हप्ता मिळाल्याने महिलांमध्ये काही प्रमाणात नाराजी पाहायला मिळत आहे. आता उर्वरित दोन महिन्यांचे पैसे नेमके कधी मिळणार, याकडे संपूर्ण राज्याचे




लक्ष लागले आहे. डिसेंबर महिना संपत आला तरी केवळ नोव्हेंबरचे पैसे खात्यात आल्याने लाभार्थी महिलांमध्ये अस्वस्थता आहे. या विलंबामागे ई–केवायसीची प्रक्रिया कारणीभूत असल्याचे बोलले जात आहे. शासनाने ई–केवायसी पूर्ण करण्यासाठी ३१ डिसेंबर ही अंतिम मुदत दिली होती. ज्या महिलांची ही प्रक्रिया अपूर्ण आहे किंवा ज्यांचे आधार कार्ड बँकेशी ▶▶ पान २ वर

## बांगलादेशात आणखी एका हिंदू तरुणाला जिवंत जाळण्याचा प्रयत्न

ढाका | वृत्तसंस्था

बांगलादेशात अल्पसंख्याक हिंदू समुदायावर होणारे हल्ला सत्र सूरुच आहे. गेल्या दोन आठवड्यांत हिंदू तरुणांवर चौथ्या हल्ल्याची घटना घडली आहे. केउरभांगा बाजार येथील औषध दुकानदाराला जिवत जाळण्याचा धक्कादायक प्रकार थर्टी फर्स्टच्या रात्री (३१ डिसेंबर) घडला. आगीच्या ज्वाळांनी वेढलेल्या तरुणाने जवळच असलेल्या तलावात उडी मारल्याने त्यांचा जीव थोडक्यात वाचला. या धक्कादायक घटनेनंतर हिंदू समुदायामध्ये भीतीचे आणि चिंतेचे वातावरण परसले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, खोकन चंद्र हा तरुण थर्टी फर्स्टच्या रात्री (३१ डिसेंबर) केउरभांगा बाजार येथील आपले औषधांचे ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### सुपर वूल्फ मूनने अवकाशात शनिवारची रात्र उजळणार

नवी दिल्ली: नववर्ष २०२६ ची सुरूवात एका विलोभनीय खगोलीय घटनेने होणार आहे. ३ जानेवारी २०२६ रोजी वर्षातील पहिले पौर्णिमेचे चंद्रदर्शन घडणार आहे. या दिवशी वर्षातील पहिला सुपरमून असेल. तो इतर पौर्णिमेपेक्षा खूप मोठा असेल. याला वुल्फ मून असेही म्हणतात. विशेष म्हणजे, या दिवशी चंद्र पृथ्वीच्या अत्यंत जवळ येणार असल्याने तो सुपरमूनच्या रूपात अवकाशात तळपताना दिसेल. स्वच्छ आकाश असल्यास संपूर्ण देशभरात हे विहंगम दृश्य दिसेल. हा केवळ २०२६ चा पहिलाच पूर्ण चंद्र नसेल, तर वर्षातील सर्वात मोठा आणि तेजस्वी चंद्र असणार आहे. या दिवशी चंद्र त्याच्या कक्षेतील पृथ्वीपासूनच्या सर्वात जवळच्या बिंदूवर असेल. त्यामुळे तो सामान्य पौर्णिमेच्या चंद्रापेक्षा साधारण १४% मोठा आणि ३०% अधिक तेजस्वी दिसेल.

### अशोक चव्हाणांनी ५० लाख घेऊन तिकीट दिले !

नांदेड: राज्यातील महापालिका निवडणुकीतील तिकीट वाटपावरुन सर्वच राजकीय पक्षातील निष्ठावंत कार्यकर्त्यांची फरफट झाल्याचे पाहायला मिळत आहे. ऐनवेळी पक्षात आलेल्या उमेदवारांना कुठे उमेदवारी देण्यात आली आहे तर कुठे आर्थिक परिस्थिती पाहूनच तिकीट दिले गेल्याने निष्ठावंतांची नाराजी उघड होत आहे. भाजपमध्ये मोठ्या प्रमाणात नाराजी पाहायला मिळत असून, नांदेड आणि लातूरमधूनही भाजप समर्थक व निष्ठावंत कार्यकर्ते मनातील खदखद बोलून दाखवत आहेत. माजी मंत्री अशोक चव्हाण यांच्या एका निष्ठावंत कार्यकर्त्याने अशोक चव्हाण यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. अशोक चव्हाण यांनी ५० लाख रुपये घेऊन पैसेवालांना तिकीट दिल्याचा गंभीर आरोप माजी नगरसेवक भानुसिंग रावत यांनी केला आहे. भानूसिंग रावत हे अशोक चव्हाण यांचे कट्टर समर्थक म्हणून ओळखले जातात.

### निमेसुलाईड पेनकिलर औषधावर केंद्र सरकारची बंदी

नवी दिल्ली : केंद्र सरकारने निमेसुलाईड या वेदनाशामक औषधाच्या १०० मिग्रॅपेक्षा जास्त क्षमता असलेल्या सर्व ओरल फॉरम्युलेशन्सवर (तोंडावाटे घेण्याच्या गोळ्या किंवा द्रव) तात्काळ प्रभावाने बंदी घातली आहे. ही औषधे मानवी आरोग्यासाठी घातक असल्याचे सांगत सरकारने त्यांच्या उत्पादन, विक्री आणि वितरणावर निर्बंध लादले आहेत. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने यासंदर्भात अधिसूचना जारी केली. ''१०० मिग्रॅपेक्षा जास्त क्षमतेच्या निमेसुलाईड गोळ्यांच्या वापरामुळे मानवी आरोग्याला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे, याची खात्री पटली आहे,'' असे मंत्रालयाने यात नमूद केले आहे. तसेच, या औषधाला अधिक सुरक्षित पर्याय उपलब्ध असल्याचेही सरकारने स्पष्ट केले आहे.

### २०२६ मध्ये पाच राज्यांत विधानसभा निवडणुका

दिल्ली: २०२५ मध्ये दिल्ली आणि बिहारमधील विजयानंतर एनडीएचा आत्मविश्वास उंचावला असतानाच, आता २०२६ चे निवडणूक वर्ष भारतीय राजकारणाची दिशा ठरवणारे असेल. यावर्षी पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळ, आसाम आणि पुडुचेरी या ४ राज्यांसह १ केंद्रशासित प्रदेशात विधानसभा निवडणुका होणार आहेत. विशेषतः बंगालमध्ये ममता बॅनर्जी विरुद्ध भाजप असे 'महायुद्ध' रंगणार असून, तामिळनाडूत अण्णाद्रमुक–भाजप युतीसमोर अभिनेता विजयच्या एन्ट्रीमुळे नवीन आव्हान उभे राहिले आहे. केरळमध्ये एलडीएफ हॅट्रीकसाठी सज्ज आहे, तर आसाममध्ये हिमंत बिस्वा सरमा आपला किल्ला लढवत आहेत. भाजपविरोधी पक्षांची सत्ता असलेल्या राज्यांतील निकाल २०२९ च्या लोकसभा निवडणुकीसाठी 'इंडिया' आघाडीची ताकद निश्चित करतील. या निवडणुकांकडे देशाचे लक्ष लागले आहे.

### ओला–उबरच्या मनमानीला लगाम

मुंबई: नवीन वर्षाच्या मुहूर्तावर देशात 'भारत टॅक्सी' या सरकारी पाठबळ असलेल्या नवीन कॅब सेवेचा प्रारंभ झाला आहे. हे 'झिरो–कमिशन' प्लॅटफॉर्म असून प्रवाशांनी दिलेले पूर्ण भाडे थेट चालकाला मिळणार आहे. यामुळे ओला–उबर सारख्या कंपन्यांच्या मनमानी कमिशनला लगाम बसेल आणि चालकांचे उत्पन्न वाढेल. प्रवाशांसाठी सर्वात मोठा दिलासा म्हणजे यात 'सर्ज प्रायसिंग' नसेल; पाऊस किंवा गर्दीच्या वेळीही जादा भाडे आकारले जाणार नाही. या सेवेअंतर्गत पहिल्या ४ किमीसाठी ३० रुपये निश्चित भाडे असेल. त्यानंतर ४ ते १२ किमीसाठी २३ रुपये आणि १२ किमीपुढील प्रवासासाठी १८ रुपये प्रति किमी दर आकारला जाईल.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१ जानेवारी २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ४४.०० क्विंटल | २,२९५ | २,८७० | २,५१४ |
| ज्वारी/हायब्रिड :४७.५० क्विंटल | १,८०० | ४,१०० | २,९५४ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : ७३.५० क्विंटल | ३,६७५ | ६,७५१ | ६,१६७ |
| उडीद : १५.०० क्विंटल | ५,२९० | ५,८०० | ५,६७८ |
| बाजरी: १९.५० क्विंटल | २,५०० | ३,३८१ | २,९१६ |
| मुग:२.०० क्विंटल | ५,७५० | ६,३०० | ६,००३ |
| सोयाबीन: ११०.०० क्विंटल | ४,५५० | ४,७५१ | ४,६७४ |
| हरभरा: १५.५० क्विंटल | ४,३०० | ५,४१० | ४,९६५ |

cmyk

अग्रलेख

# सच्चा कार्यकर्त्यांचा भ्रमनिरास !

राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीच्या निमित्ताने उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी राज्यात सर्वत्र ज्या प्रकारचा आक्रोश पहायला मिळाला ते पाहता आपली लोकशाही परिपक्व झाली आहे का अजूनही बाल्यावस्थेत आहे याबाबत शंका यावी. आपण ज्या पक्षाचे दीर्घकाळ कार्यकर्ते होतो आणि आता नगरसेवक पदाचे तिकीट आपल्यालाच मिळेल अशी खात्री असणाऱ्या अनेकांना संबंधित राजकीय पक्षांनी डावलल्याने अनेक इच्छुक उमेदवारांचा भ्रमनिरास झाला आणि त्यांचा आक्रोशही समोर आला. अनेक ठिकाणी महिला कार्यकर्त्यांना अश्रू अनावर झाले, काही ठिकाणी कार्यकर्त्यांनी वरिष्ठ नेत्यांच्या कार्यालयाची तोडफोड केली, अनेक ठिकाणी उमेदवारी न मिळाल्यामुळे काही इच्छुकांनी तातडीने पक्ष बदल करून दुसऱ्या पक्षातून उमेदवारी पदरात पाडून घेतली.

शिस्तबद्ध राष्ट्रीय पक्ष म्हणून बोलबाला असलेला भारतीय जनता पक्षालाच या आक्रोशाचा सर्वात मोठा फटका बसल्याचे दिसून आले. ज्या इच्छुकांना उमेदवारी नाकारण्यात आली होती त्यांनी नेत्यांवर गंभीर स्वरूपाचे आरोपही केले आणि इतर पक्षातून भारतीय जनता पक्षामध्ये आलेल्या लोकांना जास्त प्राधान्य देण्यात आल्यामुळे आमच्यावर अन्याय झाला, अशा प्रकारची भावनाही व्यक्त करण्यात आली. राज्यातील महानगरपालिकांची निवडणूक दीर्घ कालावधीनंतर होत आहे. साहजिकच बदललेल्या राजकीय परिस्थितीमध्ये अनेकांच्या राजकीय महत्त्वाकांक्षाही वाढल्या होत्या. भारतीय जनता पक्ष किंवा महायुतीतील इतर घटक पक्षांची उमेदवारी आपल्याला मिळाली तर निवडणुकीत यशाची खात्री असल्याने आपण नगरसेवक होऊ शकतो, असे स्वप्न बाळगणाऱ्या अनेकांच्या स्वप्नांचा भंग यानिमित्ताने झाला. मुळात राज्यात सत्तेवर असलेला भारतीय जनता पक्ष, एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी हे महायुतीमध्ये जरी एकत्र असले तरी महानगरपालिकांमध्ये मात्र अनेक ठिकाणी ते एकत्र लढत नाहीत. राज्यात तब्बल १४ ठिकाणी महायुती फिसकटली असल्याने कार्यकर्त्यांचा दबावही वाढत चालला आहे. भारतीय जनता पक्षासाठी भाकरी फिरवणे हा त्यांचा नेहमीचा विषय असला तरी अशी भाकरी फिरवल्यामुळे एवढ्या मोठ्या प्रमाणात चटका बसवणारी प्रतिक्रिया येईल अशी अपेक्षा भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांनी केली नसावी. इतर राजकीय पक्षातून भारतीय जनता पक्षामध्ये आलेल्या लोकांना प्राधान्य देण्यात येत आहे आणि जुन्या कार्यकर्त्यांना डावलण्यात येत आहे या आरोपाला भारतीय जनता पक्षाचे नेते कशाप्रकारे उत्तर देणार आहेत हे समजत नाही. लोकसभा किंवा विधानसभा निवडणुकीच्या कालावधीमध्ये सुद्धा इतर राजकीय पक्षातून भारतीय जनता पक्षामध्ये आलेल्या नेत्यांनाच उमेदवारीसाठी प्राधान्य देण्यात आले होते. इलेक्टिव्ह मेरिट हा एकमेव निकष भारतीय जनता पक्षामध्ये वापरला जात असल्याने दीर्घकाळ सच्चा कार्यकर्ता म्हणून काम करणाऱ्या अनेक इच्छुक उमेदवारांचा भ्रमनिरास होणे अपेक्षितच होते. केवळ भारतीय जनता पक्ष नाही तर इतर सर्वच राजकीय पक्षांमध्ये कमी अधिक प्रमाणात अशा प्रकारचे तीव्र आक्रोश समोर येताना दिसले. मुळात ही महानगरपालिका निवडणूक म्हणजे एक राजकीय कोडे म्हणूनच समोर येताना दिसत आहे.

कोण कोणाचे मित्र आहेत आणि कोणा कोणाची आघाडी आहे आणि कोणाकोणाची महायुती आहे याबाबत काहीच सांगता येत नसल्याने निवडणुकीची एकूण प्रक्रिया गुंतागुंतीची होताना दिसत आहे. राज्याच्या पातळीवर महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी समोरासमोर लढत असली तरी महानगरपालिकांच्या निवडणुकीमध्ये मात्र अशी समोरासमोर लढत नाही. महायुतीचे आणि महाविकास आघाडीचे घटक पक्ष एकमेकांच्या विरोधात उभे आहेत आणि आतापर्यंत एकमेकांच्या विरोधात असलेले आता एकत्र आले आहेत. बदलत्या राजकीय समीकरणामध्ये एकनिष्ठ सच्च्या कार्यकर्त्यांची कुचंबणा होणे अपेक्षितच असते. युती आणि आघाडीच्या राजकारणामध्ये जागावाटप हा नेहमीच पेचप्रसंगाचा भाग असतो. त्यामुळे काही प्रमाणात नाराजी आणि आक्रोश जरी अपेक्षित धरण्यात आला असला तरी यावेळी ह्या उद्रेकाची आणि आक्रोशाची पातळी अतिशय उच्च होती हेसुद्धा नाकारून चालणार नाही. उमेदवारी देताना मोठ्या प्रमाणात आर्थिक देवघेव झाल्याचा आरोप कार्यकर्त्यांनी केला आहे. तसेच नातेवाइकांमध्येच उमेदवारी देण्याच्या निर्णयामुळे सुद्धा प्रामाणिक कार्यकर्त्यांवर अन्याय झाल्याची भावनाही अनेक नेत्यांनी व्यक्त केली आहे. जरी काही गोष्टींचा वापर करून हा उद्रेक आणि आक्रोश थांबवण्यात राजकीय पक्षांना यश आले तरी नाराजी मात्र संपणार नाही आणि निवडणुकीच्या प्रत्यक्ष मतदानावरही त्याचा परिणाम होऊ शकतो. महायुती आणि महाविकास आघाडी यांचे प्रतिनिधित्व करणार्या घटक पक्षांना याची निश्चितच जाणीव असणार आहे. साहजिकच या आक्रोशाचा कमीत कमी फटका आपल्याला बसावा यासाठी आगामी कालावधीमध्ये त्यांच्याकडून काही उपाययोजना करण्यात आली, तर आश्चर्य वाटायला नको.

## दै.राज्य लोकतंत्रचे सचिन काळुंके यांची नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार



**अंबड । प्रतिनिधी**

दै.राज्य लोकतंत्रचे सचिन सुनील काळुंके यांची रोहीलागड सर्कल पत्रकार नियुक्ती झाल्यामुळे शाल व श्रीफळ देऊन सचिन काळुंके यांचा सत्कार करण्यात आला . यावेळी सरपंच श्री संजय काळुंके, उप सरपंच श्री आण्णासाहेब डोंगरे माजी सरपंच श्रीहरी डोंगरे श्री जगदीश पवार पोलीस पाटील तहसील कर्मचारी श्री राजूभाऊ संत्रे ग्रा.पं. माजी सदस्य शेषराव काळुंके, रमेश काटे, यांच्यासह गावातील आरून काळुंके, प्रकाश काटे बालासाहेब घुले व गावकरी जनार्दन पाटील डोंगरे गजानन डोंगरे, रमेश काळुंके, सुनील काळुंके, संतोष डाखुरकर, रावसाहेब पवार, दिलीप काळुंके, गजानन काटे, दयानंद काळुंके, रतन खोकड, पांडुरंग मालुसरे, किशोर काळुंके, सचिन काटे, मुकेश काळुंके, शंकर काळुंके, लखन काळुंके, जिवन शेजूळ, सौरभ साखरे अविनाश काळुंके, अरून काळुंके उमेश नन्नवरे, नवनाथ डोंगरे बाळु घुले सौरव साखरे संजय गरंडवाल यांच्यासह गावातील नागरिक उपस्थित होते.

# अवयवदानातून सहा जणांना जीवनदान

## धनंजय काळे यांचे प्रेरणादायी योगदान

**जालना । प्रतिनिधी**

**धनंजय अनंत काळे या परभणी वय २५ वर्ष वैद्यकीय शिक्षण सुरू असताना यांचा काकडे पेट्रोल पंप, समृद्धी टी-पॉईंट परिसरात भीषण अपघात झाला.या अपघातात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाला.**

त्यानंतर त्यांना तात्काळ संजिवनी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, जालना येथे दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी तपासणी करून परिस्थितीची गंभीरता लक्षात घेता तातडीने क्रॅनिओटोमी शस्त्रक्रिया करण्यात आली. मात्र दुर्दैवाने शस्त्रक्रियेनंतरही रुग्णाच्या प्रकृतीत अपेक्षित सुधारणा झाली नाही. १ जानेवारी २०२६ रोजी पहाटे वैद्यकीय चाचणीनंतर धनंजय यांना ब्रेन स्टेम डेड घोषित करण्यात आले. यानंतर डॉ. बळीराम बागल यांनी ही बाब रुग्णाच्या नातेवाईकांना समजावून सांगितली. रुग्णाचे नातेवाईक असलेले डॉक्टर डॉ. प्रताप वझरकर तसेच धनंजय यांच्या आई-वडिलांशी अवयवदानाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. अपार दुःखात असूनही, धनंजय यांच्या आई-वडिलांनी आणि कुटुंबीयांनी अत्यंत धैर्यशील व समाजहिताचा निर्णय घेत अवयवदानासाठी संमती दिली. या उदात्त निर्णयामुळे एकूण ६ रुग्णांना नवजीवन मिळाले. ग्रुप मार्फत अवयवांचे वाटप करण्यात आले फुफ्फुस डॉ. डी. वाय. पाटील हॉस्पिटल, पुणे यकृत (लिव्हर) रुबी हॉल क्लिनिक, पुणे एक मूत्रपिंड डॉ. हेडगेवार हॉस्पिटल, छत्रपती संभाजीनगर दुसरे मूत्रपिंड सिग्मा हॉस्पिटल, छत्रपती संभाजीनगर दोन्ही डोळे श्री गणपती नेत्रालय, जालना रुग्णाचे पार्थिव हॉस्पिटलमधून बाहेर नेत असताना राष्ट्रगीताने सन्मान देऊन त्यांना अश्रुपूर्ण आदरांजली वाहण्यात आली. यावेळी जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी, पोलीस निरीक्षक शेवाळे, पोलीस उपनिरीक्षक आरती जाधव यांच्यासह पोलीस प्रशासन उपस्थित होते. सर्व अवयवांचे ग्रीन कॉरिडोरद्वारे सुरक्षित स्थलांतर करण्यात आले. तसेच सर्व तज्ज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत शासनमान्य प्रक्रियेनुसार अवयव काढण्यात आले. या संपूर्ण प्रक्रियेत संजिवनी हॉस्पिटलचे संचालक डॉ. बळीराम बागल, डॉ. शिवदास मिरकर, डॉ. कैलास राजगुरू, डॉ. निशांत गोयल, डॉ. शालिक जाधव, डॉ. अविनाश पोळ, हर्षदा बागल, अमोल कदम तसेच हॉस्पिटलचे सर्व डॉक्टर व



कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले.मृत्यूनंतरही जीवन देणारा धनंजय काळे यांचा निर्णय समाजासाठी प्रेरणादायी ठरला आहे.

# ना.पंकजाताई मुंडे बुधवारी परळीत

## विविध कार्यक्रमांना उपस्थिती, अभ्यागतांना भेटणार

**परळी । प्रतिनिधी**

**राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे येत्या बुधवारी (दि. ३) परळी दौऱ्यावर येत असून गुरुवार (दि. ४) रोजी विविध कार्यक्रमांना उपस्थित राहणार आहेत. यावेळी त्या अभ्यागतांच्या भेटीसाठीही उपलब्ध असणार असल्याची माहिती त्यांच्या संपर्क कार्यालयाच्या वतीने देण्यात आली आहे.**

ना.पंकजाताई मुंडे मंगळवार, दि. ३ जानेवारी रोजी सायंकाळी परळीत आगमन करणार आहेत. गुरुवार, दि. ४ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता प्रसिद्ध व्यापारी ओमप्रकाश तापडिया यांच्या नव्या शोरूमचे उद्घाटन त्यांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर दुपारी ११ ते १ या वेळेत शासकीय विश्रामगृह, परळी येथे त्या अभ्यागतांच्या भेटीसाठी उपलब्ध राहणार आहेत. सायंकाळी ४ वाजता त्या माळाकोळी (ता. कंधार) येथे रवाना होणार असून तेथे लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण त्यांच्या हस्ते होणार आहे, अशी माहिती संपर्क कार्यालयाकडून देण्यात आली आहे.



**बीडः ज्येष्ठ नागरिक तथा अनेकांचे मार्गदर्शक मोहनराव कदम यांचा गुरुवारी सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास निवृत्त जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. चव्हाण, नामदेव शिंदे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक भाऊसाहेब बोबडे, निवृत्त मंडळ अधिकारी रामनाथ शेळके, तसेच नारायण नागरे, शिंदे गव्हाणे, कबाडे, ठाकुत, तिपाले आदी मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमात उपस्थितांनी मोहनराव कदम यांच्या सामाजिक कार्याचा व मार्गदर्शनाचा गौरव करून त्यांच्या पुढील आरोग्यदायी आयुष्यास शुभेच्छा दिल्या.**

# पान १ वरून...

### कापूस आयातीवर

आज कापूस दरात १०० ते २०० रुपयांपर्यंत सुधारणा दिसून आली आहे. कापसाचा सरासरी भाव ७ हजार ७०० ते ८ हजारांच्या दरम्यान पोहोचला आहे. पुढील काळात कापसाच्या दरात आणखी सुधारणा होण्याची शक्यता आहे. सरकारने आयात शुल्क कायम ठेवल्यास पुढील महिनाभरात दरात आणखी २०० ते ३०० रुपये सुधारणा होऊ शकते, असा अंदाज अभ्यासकांनी व्यक्त केला. विशेष म्हणजे कापूस आयातीवर ११ टक्के शुल्क लागू झाल्याने, बाजारात लगेच सुधारणा पाहायला मिळाली. सीसीआयची खरेदीही वाढली आहे. त्यामुळे पुढील महिनाभरात दरात आणखी सुधारणा दिसू शकते.

------------

### अन् खासदार सोनवणे यांची

पूजा सुरू असताना या ठिकाणी दक्षिणा ठेवण्यासाठी कार्यकर्त्यांनी दादांना सांगितले, मात्र दादा खिशाला हात लावून इकडे तिकडे पाहू लागले. त्यांच्यासोबत असलेले सहाय्यक दिसत नव्हते. त्याचदरम्यान त्यांच्या पाठीमागे उभे असलेले शरद पवार गटाचे खासदार बजरंग सोनवणे यांनी परिस्थिती बघून आपल्या खिशातून दक्षिणा काढली आणि ती त्यांनी आमदार संदीप क्षीरसागर यांच्या हातात दिली. आमदार संदीप क्षीरसागर यांनी ती दक्षिणा अजित दादाच्या पाठीमागे चिटकून उभे असलेले आमदार विक्रम काळे यांच्याकडे दिली. आमदार विक्रम काळे यांनी ती घेत अजित दादाकडे देण्याचा प्रयत्न केला, मात्र अजितदादांनी त्यांच्याकडे आणि पाठीमागे वळून बघितले आणि कोपऱ्यात त्यांना त्यांचे सहाय्यक दिसले. त्यांनी त्या सहाय्यकाला खुणावले आणि विक्रम काळे यांनी देऊ केलेली दक्षिणाची नोट न घेता परत केली. त्यामुळे त्या दक्षिणेचा प्रवास पुन्हा आमदार काळे कडून आमदार क्षीरसागर यांच्याकडे आणि आमदार क्षीरसागर यांच्याकडून पुन्हा खासदार बजरंग सोनवणे यांच्या खिशात गेल्याचे पहावयास मिळाले. हा सर्व घटनाक्रम पत्रकारांनी डोळ्यांनी पाहिला. विशेषतः हा क्षण इलेक्ट्रॉनिक मीडियाने आपल्या कॅमेरात देखील कैद केला.

---------------

### नाट्यगृह नूतनीकरणासाठी आठ कोटी ; मार्चपर्यंत

वर आले. आता हे काम जिल्हाधिकारी यांनी तातडीने करून घ्यायचे आहेत. हे काम बांधकाम विभागामार्फत होणार असले तरी कंत्राटदार मात्र चांगला हवा असे देखील ते म्हणाले. याशिवाय जिल्हा परिषदेच्या शाळा दुरुस्ती आणि वर्ग खोल्या बांधकामात देखील मान्यता दिली असून, ३४३ नवीन अंगणवाड्या देखील बांधल्या जाणार आहेत. कामेही दर्जेदार व्हावीत, गुत्तेदार चांगला असावा. जर काही त्रुटी आढळल्या तर सुट्टी दिली जाणार नाही, असा इशारा त्यांनी कंत्राटदारांना दिला. विशेष म्हणजे गेल्या काही वर्षापासून रेल्वेचे काम रखडले होते. आता अहिल्यानगर ते बीड आणि बीड ते वडवणी पर्यंतचे रेल्वे काम सुरू असून, इंजन ट्रायल देखील झाले आहे. पुढे वडवणी ते परळी हे काम देखील लवकरच होईल. पुढील तीन महिन्यात म्हणजे मार्चपर्यंत बीड ते परळी हा रेल्वे मार्ग पूर्णपणे सुरू होईल अशी ग्वाही देखील त्यांनी यावेळी दिली. चांगल्या कामात सहकार्य करावे, असे आव्हान त्यांनी यावेळी केले. या कार्यक्रमाला खा.बजरंग सोनवणे, आ.सुरेश धस, आ.प्रकाश सोळुंके, आ. संदीप क्षीरसागर, आ. विक्रम काळे, आ. विजयसिंह पंडित यांच्यासह जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे सीईओ जितीन रहमान, पोलीस अधीक्षक नवनीत कावत, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता रविंद्र तोंडे, विशेष लेखा परीक्षक धनंजय चव्हाण, बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण, जिल्हा उपनिबंधक सतीश तोटावर यांची उपस्थिती होती.

---------------

### या वर्षात राज्यसभेच्या

सरकारला संसदेत विधेयके मंजूर करून घेणे आणखी सोपे होणार आहे. दुसरीकडे, सरकारविरोधात दबाव निर्माण करण्याची विरोधकांची ताकद काहीशी कमी होण्याची शक्यता आहे. सध्या राज्यसभेत भाजपचे १०३ खासदार आहेत, तर संपूर्ण एनडीएचे १२६ खासदार आहेत. २०२६ मध्ये भाजपच्या ३० खासदारांचा कार्यकाळ संपणार असला, तरी किमान ३२ नवीन खासदार भाजपचे निवडून येणे जवळपास निश्चित मानले जात आहे. याशिवाय, जागावाटप आणि राजकीय समीकरणांमुळे भाजप आणखी २-३ जागा जिंकू शकतो. एनडीएतील मित्र पक्षांचेही प्रतिनिधित्व वाढण्याची शक्यता आहे. तेलुगु देशम पार्टी, जनसेना, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांना प्रत्येकी एक जागा अधिक मिळू शकते. काही जागा कमी झाल्या तरी एकूणात एनडीए चांगल्या स्थितीत राहणार आहे. अनेक ज्येष्ठ आणि प्रभावी नेत्यांचा राज्यसभेतील कार्यकाळ संपत आहे. यामध्ये काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, माजी पंतप्रधान एच. डी. देवगौडा, शरद पवार, दिग्विजय सिंह, अभिषेक मनू सिंघवी यांसारखे मोठे नेते आहेत. याशिवाय, केंद्रीय मंत्री हरदीपसिंह पुरी, रामदास आठवले, प्रियंका चतुर्वेदी, उपेंद्र कुशवाहा, रामगोपाल यादव, हरिवंश नारायण सिंह (राज्यसभेचे उपसभापती) यांचाही कार्यकाळ पूर्ण होत आहे. जर हे नेते पुन्हा निवडून आले नाहीत, तर त्यांचा केंद्रातील प्रभाव कमी होऊ शकतो.

--------------

### भारताच्या पहिल्या बुलेट

रेल्वे मंत्र्यांनी या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या विस्ताराबाबत माहिती देताना सांगितले की, बुलेट ट्रेनचे काम एकूण पाच टप्प्यांत विभागले गेले आहे. सूरत ते बिलिमोरा या पहिल्या टप्प्यानंतर दुसऱ्या टप्प्यात सूरत ते वापीपर्यंतचा मार्ग पूर्ण केला जाईल. त्यानंतरच्या तिसऱ्या टप्प्यात अहमदाबादपर्यंत रेल्वे पोहोचेल, तर चौथ्या टप्प्यात महाराष्ट्रातील ठाणे शहरापर्यंत ही सेवा विस्तारित होईल. प्रकल्पाच्या पाचव्या आणि अंतिम टप्प्यात अहमदाबाद ते मुंबई हा संपूर्ण ५०८ किमीचा मार्ग प्रवाशांसाठी पूर्णपणे खुला केला जाईल. हा संपूर्ण प्रकल्प तांत्रिकदृष्ट्या गुंतागुंतीचा असल्याने तो पूर्ण क्षमतेने सुरू होण्यास काही वर्षे लागतील, असेही त्यांनी स्पष्ट केले. नॅशनल हाय स्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेडने दिलेल्या आकडेवारीनुसार, या ५०८ किमी लांबीच्या प्रकल्पाचा ३४८ किमीचा मोठा हिस्सा गुजरातमध्ये, १५६ किमीचा हिस्सा महाराष्ट्रात आणि उर्वरित ४ किमीचा भाग दादरा आणि नगर हवेलीमध्ये येतो. साबरमती ते मुंबई दरम्यान एकूण १२ स्थानके असतील, ज्यात साबरमती, अहमदाबाद, आणंद, वडोदरा, भरूच, सूरत, बिलिमोरा, वापी, बोईसर, विरार आणि ठाणे या स्थानकांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, ताशी ३२० किमी वेगाने धावणारी ही ट्रेन मुंबई-अहमदाबाद हे अंतर केवळ २ तास ७ मिनिटांत पूर्ण करेल, ज्यामुळे प्रवाशांच्या वेळेत मोठी बचत होणार आहे.

-------------

### खा.सोनवणे यांचा साखर कारखाना

असल्याच्या आरोपावरून शेतकरी संघटनेने आज साखर कारखान्याच्या गव्हाणी मध्ये उतरून घोषणा देत साखर कारखाना बंद पाडला. बार्शी येथील येडेश्वरी शुगर युनिट दोन हे सुरू असून या भागातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना या कारखान्याकडून योग्य भाव दिला जात नाही ३००० रुपये पहिला हप्ता आणि ऊसाला चार हजार रुपये प्रति टन भाव देण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे मात्र या कारखान्याकडून २८०० रुपये दर दिला जातो २०० रुपयाचा काटा भावात ही मारला जातो असा आरोप शेतकरी संघटनेचे नेते शंकर गायकवाड यांनी केला असून आज शेतकऱ्यांनी कारखान्यावर जाऊन कारखाना बंद पाडल्याची घटना घडली यावेळी शंकर गायकवाड म्हणाले की हे काय बीड नाही सोलापूर आहे राज्यातील साखर कारखाने भाव देत असताना हे मात्र काटा मारतात असा आरोप त्यांनी केला.

--------------

### राज्यभरात १३ नगरसेवक

राज्यात सध्या महापालिका निवडणुकीचे वातावरण चांगलेच तापले आहे. उमेदवारी अर्ज भरण्याच्या नाट्यातून पुढे येत आता अर्जांची छाननी केली जात असून, यात राजकीय पक्ष एकमेकांना धक्के देत आहेत. तर काही ठिकाणी बिनविरोध विजयाचे गुलाल उधळण देखील सुरू झाली आहे. भाजपचे उमेदवार बिनविरोध निवडून येत असल्याने भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची रणनीती यशस्वी ठरत असल्याचे बोलले जात आहे. मात्र, आता शिवसेना शिंदे गटाचेही ४ उमेदवार बिनविरोध निवडून आल्याने खासदार श्रीकांत शिंदे यांची खेळी यशस्वी झाली असल्याचे पाहायला मिळत आहे. भाजपच्या रेखा चौधरी, आसावरी नवरे, रंजना पेंकर, मंदा पाटील यांच्यासह ज्योती पवन पाटील या बिनविरोध निवडून आल्या आहेत. याचे श्रेय रवींद्र चव्हाण यांच्या रणनीतीला दिले जात आहे. कल्याण - डोंबिवलीमध्ये शिवसेना शिंदे गटाकडून पॅनल क्र. २४ मधून रमेश म्हात्रे, विश्वनाथ राणे, वृषाली रणजित जोशी तर प्रभाग क्र. २८ अ मधून हर्षल राजेश मोरे यांची बिनविरोध निवड झाली आहे. हर्षल मोरे हे आमदार राजेश मोरे यांचे चिरंजीव आहेत. येथील सर्व अपक्ष उमेदवारांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्यानंतर या निवडणुका बिनविरोध झाल्या. तसेच याचे श्रेय खासदार श्रीकांत शिंदे यांना दिले जात आहे.

-----------

### बांगलादेशात आणखी एका

दुकान बंद करून घरी परतत होता. रात्री ९ च्या सुमारास तिलोई परिसरात दबा धरून बसलेल्या गुंडांनी त्यांना रस्त्यात अडवले. जमावाने प्रथम त्यांना बेदम मारहाण केली. धारदार शस्त्रांनी त्यांच्यावर वार केला. एवढ्यावरच न थांबता नराधमांनी त्यांच्या अंगावर पेट्रोल ओतून त्यांना पेटवून दिले. गंभीर जखमी अवस्थेत असलेल्या खोकन यांनी प्रसंगावधान राखत जवळच्या तलावात उडी घेतली. स्थानिक नागरिकांनी त्यांना तातडीने शरीयतपूर सदर रुग्णालयात दाखल केले. खोकन यांची प्रकृती सध्या चिंताजनक असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे. भारतविरोधी तरुण नेता शरीफ ओसमान हादी याच्या हत्येनंतर बांगलादेशात हिंदू समुदायावर हल्ले आणि मॉब लिंचिंगच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. हादीच्या मारेकऱ्यांनी भारतात आश्रय घेतल्याच्या अफवेमुळे या आंदोलनाला भारतविरोधी वळण लागले आहे. या पार्श्वभूमीवर खोकन यांच्यावर झालेल्या हल्ल्यामुळे हिंदू समुदायामध्ये भीतीचे आणि चिंतेचे वातावरण आहे. खोकन यांच्यावरील हल्ल्याच्या आदल्याच दिवशी, मयमनसिंग येथे बजेंद्र बिस्वास या हिंदू सुरक्षा रक्षकाची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. गारमेंट फॅक्टरीत कर्तव्यावर असताना नोमान मिया नावाच्या व्यक्तीने तुला गोळी मारू का? असे विचारत बिस्वास यांच्यावर गोळी झाडली होती. बिस्वास आणि मिया हे दोघेही गृह मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या अन्सार वाहिनीचे सदस्य होते.

-----------

### लाडक्या बहिणींचा

लिंक नाही, अशा महिलांना पुढील लाभापासून मुकावे लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे उर्वरित हप्ते मिळण्यापूर्वी पात्र लाभार्थींची यादी पुन्हा एकदा तपासली जाण्याची शक्यता आहे. ज्या महिलांना अद्याप खात्यात पैसे जमा झाल्याचा संदेश आलेला नाही, त्यांनी तांत्रिक कारणांमुळे किंवा बँक सर्व्हरच्या समस्येमुळे संदेश येण्यास उशीर होऊ शकतो हे लक्षात घेतले पाहिजे. अशा महिलांनी बँकेत जाऊन आपले पासबुक अपडेट करावे किंवा मोबाईल बँकिंगच्या माध्यमातून खात्यातील शिल्लक तपासावी, असे आवाहन तज्ज्ञांकडून करण्यात आले आहे. तसेच ई-केवायसी न केलेल्या महिलांचे हप्ते नवीन वर्षात कायमचे बंद होण्याचा धोका असल्याने, उर्वरित हप्त्यांचे वाटप हे पूर्णपणे केवायसीच्या यशस्वी पडताळणीवर अवलंबून असणार आहे. दुसरीकडे, ३१ डिसेंबरपर्यंत ई-केवायसी न केलेल्या महिलांना २०२६ पासून या लाभाला मुकावे लागण्याची शक्यता आहे. तांत्रिक कारणांमुळे ज्यांना एसएमएस आले नाहीत, त्यांनी बँक पासबुक तपासून खात्री करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. डिसेंबर आणि जानेवारीच्या हफ्त्यांबाबत अद्याप अनिश्चितता असल्याने लाभार्थी महिला शासनाकडून राहिलेल्या हप्त्यांबाबत स्पष्ट माहितीच्या प्रतीक्षेत आहेत. दरम्यान, शासनाकडून डिसेंबर आणि जानेवारी महिन्यांच्या हप्त्यांबाबत अद्याप कोणतीही अधिकृत तारीख जाहीर करण्यात आलेली नाही. मात्र, जानेवारी महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात प्रलंबित हप्ते जमा होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. जोपर्यंत शासन या प्रलंबित हप्त्यांबाबत आणि मुदतवाढीबाबत स्पष्ट घोषणा करत नाही, तोपर्यंत लाभार्थी महिलांमधील ही अनिश्चितता कायम राहणार आहे. आता नवीन वर्षाच्या सुरुवातीला सरकार लाडक्या बहिणींना उर्वरित हप्त्यांची भेट देणार का, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

## थोडक्यात



**आष्टी : शहरातील सर्प मित्र शंकराचा निस्सीम भक्त सिताराम टेकाडे यांने गणपती मंदिर ते आष्टी पिंपळेश्वर मंदिर लोटांगण घेत आपली नवस पुरती केली. यावेळी देविदास आबा धस, पत्रकार प्रफुल्ल भाऊ सहस्त्रबुद्धे यांनी सत्कार केला. (छाया संदीप अनारसे)**

### सरला मुंदडा यांचे निधन

माजलगाव : शहरातील प्रतिष्ठित व्यापारी मधुर कृषी सेवा केंद्राचे मालक पुरुषोत्तम(जीवनभाऊ)मुंदडा यांच्या भार्या सौ सरला मुंदडा वय ६३ यांचे उत्तरं प्रदेश स्थित प्रसिद्ध धार्मिक ठिकाण



चित्रकूट येथे दि ३१ डिसेंबर बुधवार रोजी मध्यरात्री हृदयावीकराचा झटका येऊन निधन झाले.१ जाने गुरुवार रोजी सकाळी ९:३० वाजता राजस्थानी वैकुंठ धाम माजलगाव येथे त्यांच्यावर अंत्यविधी करण्यात येणार आहे. मूळचे तालखेड येथील तसेच तालुक्यातील प्रतिष्ठित व्यापारी कुटुंब असलेल्या मुंदडा परिवारतील पुरुषोत्तम मुंदडा हे पती पत्नी चित्रकूट येथे कथा ऐकण्यासाठी तसेच आयोध्या, प्रयागराजच्या तीर्थ यात्रेवर गेले होते.मात्र यां दरम्यान ३१ डिसेंबर च्या मध्यरात्री सौ सरला भाभी या हृदयाविकाराचा जोराचा झटका येऊन पडल्या त्यांना हॉस्पिटल ला घेऊन जाईपर्यंत त्यांचें निधन झाले.डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. अतिशय धार्मिक वृतीच्या सौ सरला यां चालत्या बोलत्या गेल्यामुळे मुंदडा परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. गुरुवारी सकाळी ९:३० वाजता त्यांच्यावर माजलगाव येथील राजस्थानी वैकुंठ धाम येथे अंत्य संस्कार करण्यात येणार आहे. त्यांच्या पश्चात पती, चार दिर, एक मुलगा राहुल, सून, मुलगी जावाई व नातवंड असा मोठा परिवार आहे. मुंदडा परिवाराच्या दुःखात दै.राज्य लोकतंत्र परिवार शामिल आहे.

### ज्ञानदीप प्राथमिक विद्यालयात मानवी साखळीने नववर्ष २०२६ चे उत्साहात स्वागत

किल्ले धारूर : किल्ले धारूर येथील ज्ञानदीप प्राथमिक विद्यालयात नववर्ष २०२६ चे स्वागत अत्यंत उत्साहपूर्ण व शिस्तबद्ध वातावरणात करण्यात आले. इयत्ता




पहिली ते सातवीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांनी मानवी साखळीच्या माध्यमातून थएङउजचए २०२६ हे नाव साकारत नववर्षाचे अनोख्या पद्धतीने स्वागत केले. विद्यार्थ्यांच्या या सर्जनशील उपक्रमामुळे संपूर्ण शाळा परिसरात आनंदाचे व सकारात्मकतेचे वातावरण निर्माण झाले. या उपक्रमाचे नियोजन व अंमलबजावणी विद्यालयातील शिक्षकवृंदांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये एकात्मता, सहकार्य, शिस्त, आत्मविश्वास व सर्जनशीलता वाढविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

या माध्यमातून विद्यार्थ्यांचा उत्साह व शाळेचे संस्कारक्षम वातावरण अधोरेखित होते. ज्ञानदीप परिवारातर्फे सर्व विद्यार्थी व पालकांना नववर्ष २०२६ च्या हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या. या उपक्रमामध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थी व शिक्षक वृंद उपस्थित होते

# बजाज यांनी केलेले खरेदीखत विक्रीपत्र नाममात्र बेकायदेशीर

## दाव्याच्या अंतिम निकालापर्यंत विक्री व्यवहारास माजलगाव न्यायालयाकडून स्थगिती

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव शहरातील छ.संभाजी चौक सारख्या मोक्याच्या ठिकाणी असलेले सर्वे नंबर ३८४ गट नंबर २४४ मधील अस्तित्वात नसलेला प्लॉट क्रमांक २८ चा खरेदी विक्री चा व्यवहार हा नाममात्र बेकायदेशीर व कब्जा नसताना झालेला असल्याने दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत या प्लॉटच्या खरेदी विक्री व्यवहारात स्थगिती देणारा आदेश माजलगाव दिवानी (वरिष्ठ स्तर) न्यायालयाने दिल्याने बोगस कागदपत्राच्या आधारे मोक्याच्या जागेवर कब्जा करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे.

शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौक भागातील सर्वे नंबर ३८४ गट नंबर २४४ मधील मूळ मालक मुरलीधर बजाज (मयत) सत्यनारायण बजाज दामोधर बजाज व इतरांची प्लॉटिंगची जमीन होती.अत्यंत मोक्याच्या जागेवर असलेल्या या संपूर्ण प्लॉटिंगची विक्री बजाज कुटुंबीयांनी केलेली आहे. नगर रचनाकार बीड यांनी पुनर्र स्थापित केलेल्या प्लॅनमध्ये सर्व प्लॉट विक्री केल्याचे दाखवलेले असतानाही जुन्या व रद्द केलेल्या प्लॅनचा वापर करत या जागेचे मूळ मालक सत्यनारायण बजाज,दामोधर बजाज व इतरांनी माजलगाव न्यायालयाची दिशाभूल व फसवणूक करत मयत मुरलीधर बजाज यांचे वारसदार असल्याचे नोंद करून घेतली. माजलगाव नगरपरिषद मधील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संगनमताने आपली नावे अस्तित्वात नसलेल्या सर्वे क्रमांक ३८४ गट नंबर २४४ मधील प्लॉट क्रमांक २८ व २९ च्या पी.टी.आर.वर नोंदवत बनावट पी.टी.आर.तयार केला होता. या पी.टी.आर च्या आधारे सत्यनारायण बजाज, दामोधर बजाज व इतरांनी खरेदी विक्री खत क्रमांक ४४२३/२०२१ दिनांक ०८.०९.२०२१ आणि क्रमांक ४४२६/२०२१ दिनांक ०९.०९.२०२१ रोजी अनुक्रमे उमाकांत कचरू जाधव व शेख जावेद शेख खलील यांना प्लॉट क्रमांक २८ ची विक्री केले होती. सर्वे क्रमांक ३८४ गट नंबर २४४ मधील सदरील प्लॉट क्रमांक २८ व २९ अस्तित्वात नसताना हा व्यवहार झाल्याने खरेदी करणारे उमाकांत जाधव व शेख जावेद शेख खलील यांनी उमेश रामचंद्र साडेगावकर,जयेश रामचंद्र साडेगावकर व दत्तात्रेय साडेगावकर यांच्या मालकी ताब्यातील प्लॉट क्रमांक ३० वरील काही भागावर अतिक्रमण करून जागेचा ताबा घेण्याचा प्रयत्न केला. सदरील वादा नंतर माजलगाव दिवानी न्यायालयामध्ये उमेश साडेगावकर व इतरांनी दावा दाखल करत बजाज बंधू यांनी केलेला बोगस खरेदीविक्री पत्र व्यवहार रद्द करून या व्यवहारास स्थगिती देण्याचे मागणी केली होती.याप्रकरणी माजलगाव दिवानी (वरिष्ठ स्तर) न्यायालयामध्ये या संपूर्ण प्रकरणाची पुराव्यानिशी तपासणी झाल्यानंतर बजाज यांचा प्लॉट क्रमांक २८ व २९ वर ताबा नसताना व नगररचनाकार बीड यांनी रद्द केलेल्या जुन्या प्लॅनचा वापर करून माजलगाव न्यायालयात दिशाभूल व फसवणूक करत वारसदाराचे प्रमाणपत्र मिळवले. तसेच नगररचनाकार बीड यांनी पुनर्र स्थापित केलेल्या नवीन प्लॅनमध्ये विक्री केलेले प्लॉट क्रमांक २८ व २९ चे कोणतेही खरेदी खत नसताना माजलगाव नगर परिषद मधील नामांतर विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संगनमताने पी.टी.आर वर नाव नोंदवूले. जागेचा ताबा नसताना प्लॉट क्रमांक २८ चा खरेदी विक्री चा हा व्यवहार नाममात्र बेकायदेशीर व विना ताबा असल्याचे स्पष्ट निरीक्षण आपल्या स्थगिती आदेशामध्ये माजलगाव सह दिवाणी (वरिष्ठ स्तर) न्यायाधीश डी.एन.चामले साहेब यांनी व्यक्त केले.तसेच दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत प्लॉट क्रमांक २८ च्या खरेदी विक्रीचा,बक्षीसपत्राचा, गहाण खताचा वा अन्य हस्तांतरन, पद्धतीद्वारे व्यवहार करण्यास बजाज बंधू, तसेच या जागेची खरेदी करणारे उमाकांत कचरू जाधव,शेख जावेद शेख खलील यांच्याविरुद्ध स्थगिती आदेश दिला. न्यायालयात फिर्यादीच्या बाजूने एडवोकेट शरद सोळंके एडवोकेट विक्रम कदम यांनी बाजू मांडली. तर प्रतिवादीच्या बाजूने एडवोकेट जी.एम.गजमल,एडवोकेट आर. एल.छाबडा,एडवोकेट एस.एस.राठोड यांनी बाजू मांडली.

# धानोरा रोड ५० फूट रुंदीचा करण्यात यावा

## बीड शहर बचाव मंच व सर्वपक्षीय प्रतिनिधींची मुख्याधिकाऱ्यांकडे मागणी

बीड । प्रतिनिधी

शहरातील धानोरा रोडच्या सुरू झालेल्या कामाच्या संदर्भात आज दि.१ जानेवारी २०२५ रोजी बीड शहर बचाव मंच व सर्वपक्षीय प्रतिनिधींची नगर परिषद मुख्याधिकारी यांच्या कार्यालयामध्ये महत्त्वाची बैठक घेण्यात आली.या बैठकीमध्ये धानोरा रोडचे नवनिर्माण वाढत चाललेल्या विस्तारानुसार व रहदारीच्या गरजेनुसार पुरेशा रुंदीकरणासह करण्यात यावे. नगर परिषदेचे मुख्याधिकारी निलेश फडसे साहेब यांनी बीड नगर परिषदेचा कार्यभार हातात घेतल्यानंतर तात्काळच बऱ्याच वर्षांपासून व खूपच काळ प्रलंबित राहिलेल्या धानोरा रोड साठी प्राधान्यक्रम देऊन नव निर्मिती साठी व त्यासंदर्भातील



मंजुरींसाठी सहकार्य केलेले आहे. तरी वस्तुस्थिती अन्वये धानोरा रोड हा बीड शहराला नूतन मुख्य रेल्वे स्थानकाला तसेच अनेकानेक गाव खेड्यांना जोडणारा मुख्य रस्ता आहे. याच रस्त्यावर नऊ ते दहा शाळा-विद्यालये आहेत. तसेच शहराच्या वाढत्या विस्ताराबरोबरच वाढत्या लोकसंख्येप्रमाणे धानोरा रोड वरून मोठे दळणवळण दररोज होत असते. धानोरा रोड वरून होणाऱ्या दैनंदिन रहदारीच्या गरजेनुसार या रस्त्याचे नवनिर्माण भक्कम पद्धतीचे, दर्जेदार व पुरेशा रुंदीकरणासह होणे गरजेचे आहे. तरी स्थानिक जनतेच्या व रहदारीच्या गरजेनुसार या रस्त्याचे निर्माण कमीत कमी ५० फूट रुंदीकरणासह करण्यात यावे अशी मागणी बीड शहर बचाव मंच व सर्वपक्षीय प्रतिनिधींच्या वतीने बीड नगर परिषदेचे मुख्य अधिकारी निलेश फडसे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. ५० फुट रुंदीकरणासह रस्त्याचे निर्माण न झाल्यास. लोकशाही पद्धतीने तीव्र आंदोलनाचा इशारा देखील निवेदनात दिला आहे. या बैठकीमध्ये प्रामुख्याने बीड शहर बचाव मंचाचे मार्गदर्शक प्रा.कॉ. डी.जी तांदळे , अध्यक्ष नितीनजी जायभाये, संपादक- पत्रकार साहस आदोडे, मातृभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. संजय तांदळे, शिवसेना जि. संघटक रतनजी गुजर, एस.डी.पी. आय. पार्टीचे काझी तखियोद्दिन, कलीमभाई फारोकी, दिशान फारोकी, समीर काजी, रा.कॉ. श.प.गटाचे अमोल पारवे,रा.कॉ. श.प.गटाचे आम्रपाली साबळे, निवृत्त पो.नि. गोरख दिवे, पत्रकार नितेश उपाध्याय आदी नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

### सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या रा.से.यो. शिबिराचे उद्घाटन संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने शाश्वत विकास, पाणलोट व्यवस्थापक व पडीक जमीन विकासासाठी युवा शक्ती या ब्रीदा अंतर्गत दि १ जानेवारी रोजी रामपिंपळगाव येथे सात दिवशीय शिबिराचे उद्घाटन संपन्न झाले.

दि. १ ते ७ जानेवारी २०२६ या कालावधीत सात दिवसीय विशेष निवासी शिबिर रामपिंपगाव येथे आयोजित करण्यात आले आहे.

उद्घाटनपर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. जी.के.सानप होते तर उद्घाटन सरपंच रामेश्वर चाळक यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ. एन. के. मुळे,उपप्राचार्य डॉ. एम.ए.कव्हळे, उपसरपंच लांबुड,तलाठी इंगळे मॅडम, शुभम वाणी,मुख्याध्यापक कांबळे,कार्यक्रमाधिकारी बिलास काळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना सरपंच रामेश्वर चाळक म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिराच्या माध्यमातून गावात नक्कीच सकारात्मक बदल घडेल असा आशावाद व्यक्त व्यक्त करून सहकार्याची भावना व्यक्त केली.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. जी. के.सानप म्हणाले की, युवकांनी शिक्षणाबरोबरच सामाजिक विषयांवर व्यक्त झालं पाहिजे. सामाजिक प्रश्नांची उकल करण्याची क्षमता युवकांमध्ये आहे. युवकांच्या या क्षमतेला राष्ट्रीय सेवा योजनेच्या विविध उपक्रमांच्या माध्यमातून चालना मिळते. राष्ट्रीय सेवा योजनेमुळे विद्यार्थ्यांचा सामाजिक प्रश्नांकडे बघण्याचा दृष्टिकोन सकारात्मक बनतो. यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ. एन. के. मुळे, उपप्राचार्य डॉ. एम. ए.कव्हळे यांनी मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. बिलास काळे यांनी केले. सूत्रसंचालन स्वयंसेविका नंदनी गर्गे तर आभार प्रतीक्षा ढगे हिन मानले.याप्रसंगी रासेयो स्वयंसेवक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भगवान बाबांच्या पुण्यतिथी निमित्त ११ क्विंटल साखर अर्पण; सरपंच घुले यांचा गावकऱ्यांच्या वतीने सन्मान

**पाटोदा । प्रतिनिधी**

सावरगाव ही राष्ट्रसंत श्रीगुरु भगवान बाबा यांची जन्मभूमी असून भगवान बाबा हे केवळ महान अध्यात्मिक गुरूच नव्हते, तर ते थोर समाजसुधारकही होते. ''एक एकर विका पण लेकरांना शिकवा'' हा क्रांतिकारी विचार त्यांनी त्या काळात समाजात रुजवला. त्याच विचारांच्या फलश्रुतीमुळे आज या भागातून अनेक अधिकारी, उद्योजक व विचारवंत घडले आहेत. डोंगरदऱ्यात राहणाऱ्या सामान्य जनतेला त्यांनी भक्तीमार्गाची दिशा दिली.

घाट सावरगाव भगवान भक्ती गड येथे सुरू असलेल्या राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त सौताडा गावाचे सरपंच महादेव घुले यांच्या वतीने प्रसादासाठी ११ क्विंटल



साखर अर्पण करण्यात आली. या निमित्ताने घाट सावरगाव येथील ग्रामस्थांनी साखरेची व सरपंच महादेव घुले यांची भव्य मिरवणूक काढली.

यानंतर ग्रामस्थांच्या वतीने सरपंच महादेव घुले यांचा फेटा बांधून सन्मान करण्यात आला. यावेळी बोलताना सरपंच महादेव घुले म्हणाले, ''संत भगवान बाबा यांची सेवा करण्याची संधी मिळणे हे मी माझे मोठे भाग्य समजतो.या पुण्यतिथी सोहळ्यासाठी सावरगाव घाट येथील सर्व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम भक्तिमय वातावरणात सुरु आहे

### माजी माहिती संचालक एकनाथ गायकवाड यांचे निधन

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**

मराठवाडा विभागाचे पहिले सेवानिवृत्त माहिती संचालक एकनाथ दामूजी गायकवाड यांचे आज बुधवार दिनांक ३१ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी नऊ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. ते ८३ वर्षाचे होते. कै. गायकवाड यांच्या पश्चात त्यांची पत्नी, दोन मुले, तीन मुली, सून, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे.



गुरुवार दिनांक १ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १२ वाजता पडेगाव येथील ख्रिश्चन स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. कै. एकनाथ गायकवाड यांनी मुंबई, नवी मुंबई , नाशिक, पुणे, नांदेड , लातूर , धाराशिव, छत्रपती संभाजी नगर येथे सेवा केली आहे. एक जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता सेवन हिल जवळील सेंट थॉमस चर्च येथे मिसा आयोजित केला आहे.

## जय जवान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाची शैक्षणिक सहल संपन्न

वडवणी । प्रतिनिधी

विद्यालयाचे प्राचार्य श्री सारोक्ते डी जी सर यांच्या मार्गदर्शनात सदरील सहलीचा मार्ग हा कवडगाव बुद्रुक - ओझर गणपती अष्टविनायक- जुन्नर छत्रपती शिवाजी महाराज जन्म स्थळ शिवनेरी किल्ला - जी एम आर टी खोडद नारायणगाव- भुईकोट किल्ला अहमदनगर- चांदबीबी महाल - कवडगाव बुद्रुक या मार्गे सुरक्षित व सुखकारक रित्या प्रवास करत शैक्षणिक सहल पूर्ण झाली सदरील सहली मध्ये वरील मार्ग प्रमाणे सर्व विद्यार्थ्यांनी उत्साहपूर्ण व अनुशासन पालन करत व्यवस्थितपणे सहलीचा आनंद घेत विविध प्रकारची माहिती सामाजिक, ऐतिहासिक, धार्मिक,एकजुटीची भावना मानवीय मूल्यांची जोपासना करत सदरील सहलीमध्ये नैसर्गिक आनंदही घेता घेता आरोग्याच्या दृष्टीनेही निसर्गरम्य वातावरणात गडावरील ट्रेकिंग सुरक्षितपणे केली व शिवनेरी किल्ल्याबद्दल ऐतिहासिक माहिती मिळवून प्रत्यक्षरीत्या गडावरील ऐतिहासिक घटनांचा संदर्भ देत सर्व माहिती देण्यात आली व किल्ल्याचा आनंद विद्यार्थ्यांनी घेतला तसेच वैज्ञानिक क्षेत्रामध्ये रुची निर्माण व्हावी, विज्ञान विषयाची आवड निर्माण व्हावी व आपल्या कल्पकतेला वाव मिळावा यासाठी विद्यार्थ्यांना जगातील सर्वात मोठी रेडिओ



दुर्बीण म्हणजे (जी एम आर टी) खोडद नारायणगाव या केंद्रास भेट देऊन सर्व विद्यार्थ्यांना रेडिओ लहरी आकाशातून कशा पद्धतीने रिसिव्ह केल्या जातात व कशा पद्धतीने त्यांचा अभ्यास करून आकाशातील विविध ग्रह तारे व इतर घटनांचा अभ्यास केला जातो याची परिपूर्ण माहिती विद्यार्थ्यांनी करून घेतली प्रत्यक्षरीत्या महाकाय रेडिओ दुर्बीण कशा पद्धतीने कार्य करते याची कल्पना,माहिती जीएमआरटी चे श्री.गायकवाड सर यांनी विद्यार्थ्यांना परिपूर्ण अशी माहिती दिली विद्यार्थ्यांना वैज्ञानिक अविष्कार बघून भारावून गेले तसेच पुढील ठिकाणासाठी सहल मार्गस्थ होऊन अहिल्यानगर येथील मिलिटरी कॅम्प मधील कॅलव्हरी टँक म्युझियम येथे भेट देऊन भारत देशामधील संरक्षणाच्या दृष्टीने स्वातंत्र्य अगोदर व स्वातंत्र्यानंतर वापरण्यात आलेले विविध प्रकारचे रणगाडे पाहिले व त्यांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली सर्वांनी प्रत्यक्षपणे युद्धात वापरलेले विविध रणगाडे विद्यार्थ्यांनी पाहिले व त्याबद्दल पूर्णपणे माहिती जाणून घेतली पुढे भुईकोट किल्ला बघितला व त्यानंतर चांद बीबी महाल सुंदर स्थापत्य कलेचे उदाहरण असलेल्या या महालाची माहिती विद्यार्थ्यांना दिली सहल सुरक्षित व सुखकारक प्रवास करत जय जवान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कवडगाव बु येथे पोहचली व सहल संपन्न झाली. सदरील सहली मध्ये घाडगे सर, टाले सर, चोपडे सर, सहल विभाग प्रमुख, तौर मॅडम व सहभा

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ९८०/२०२५**
**जीवन विठ्ठल शिंघन विरुद्ध**
**ग्रामपंचायत कार्यालय कोल्हारवाडी**

पहा

१.जीवन विठ्ठल शिंघन रा.कोल्हारवाडी ता.जि.बीड

उपरोक्त प्रमाणे जन्ममृत्यु नोंद दावा प्रकरण विधिज्ञ मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्मधारक प्रज्ञा जीवन शिंघन यांचा दिनांक २१/११/२०१२ रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्माची नोंद जन्ममृत्यू नोंदवही मध्ये घेण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरहून येस जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय /न.प कार्यालय कोल्हारवाडी ता. बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर होऊन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे कोल्हारवाडी ता.जि. बीड येथील जन्ममृत्यू रजिस्टर ला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनाक ०१/०१/२०२६ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख ०१/०२/२०२६ ही आहे

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार, बीड**

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ९८१/२०२५**
**जीवन विठ्ठल शिंघन विरुद्ध**
**ग्रामपंचायत कार्यालय कोल्हारवाडी**

पहा

१.जीवन विठ्ठल शिंघन रा.कोल्हारवाडी ता.जि.बीड

उपरोक्त प्रमाणे जन्ममृत्यु नोंद दावा प्रकरण विधिज्ञ मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्मधारक प्रदीप जीवन शिंघन यांचा दिनांक ०९/०१/२०१० रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्माची नोंद जन्ममृत्यू नोंदवही मध्ये घेण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरहून येस जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय /न.प कार्यालय कोल्हारवाडी ता. बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर होऊन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे कोल्हारवाडी ता.जि. बीड येथील जन्ममृत्यू रजिस्टर ला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनाक ०१/०१/२०२६ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख ०१/०२/२०२६ ही आहे

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार, बीड**

जा.क्र.न.प.अंबड/नामांतर/२०२५/७४६
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक १७/१२/२०२५

**नाव बदलण्याचा जाहिरनामा**

अर्जदार श्री./सौ. श्रीमती :- अंबिका हनुमंत शेलार

प्रकरण : सर्वे नं -७८ प्लॉट नं- ८९ न.प. मि.नं-१८-१४३-८९ चे हस्तांतरन बाबत.

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प. मालमत्ता घर क्र. (१८-१४३-८९) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतुः सिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुःसिमा
पुर्व - प्लॉट नं.१०४
पश्चिम :- याच प्लॉटमधील संजीवनी अच्युत राठोड व अच्युत बाजीराव राठोड यांनी खरेदी घेतलेला भाग
दक्षिण :-प्लॉट नं.९०
उत्तर प्लॉट नं -९ मी.रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता

**स्वाक्षरित/-**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**

जा.क्र.न.प.अंबड/नामांतर/२०२५/७४७
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक १७/१२/२०२५

**नाव बदलण्याचा जाहिरनामा**

अर्जदार श्री./सौ. श्रीमती :- संजिवनी अच्युत राठोड २) अच्युत बाजीराव राठोड

प्रकरण : सर्वे नं -७८ प्लॉट नं- ८९ न.प. मि.नं-१८-१४३-८९ चे हस्तांतरन बाबत.

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प. मालमत्ता घर क्र. (१८-१४३-८९) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतुः सिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुःसिमा
पुर्व - याच प्लॉटमधील अंबिका हनुमंत शेलार यांनी खरेदी घेतलेला भाग
पश्चिम :- ९ मी.रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
दक्षिण :-प्लॉट नं.९०
उत्तर प्लॉट नं -९ मी.रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता

**स्वाक्षरित/-**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**

# किसानचे पैसे पाहिजेत? नववर्षात ही ३ कामे करावीच लागतील

पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेचा लाभ घेणाऱ्या शेतकऱ्यांसाठी या योजनेच्या माध्यमातून दरवर्षी ६००० रुपये शेतकऱ्याच्या बँक खात्यात जमा केले जातात. २००० रुपयांच्या एकूण ३ हप्त्याच्या माध्यमातून हे पैसे शेतकऱ्याला देण्यात येतात. आत्तापर्यंत पीएम किसान योजनेचे २१ हप्ते शेतकऱ्यांना मिळालेले असून आता शेतकरी २२ व्या हप्त्याच्या प्रतीक्षेत आहेत. त्यापूर्वीच शेतकऱ्यांना नवीन वर्षात ३ गोष्टी कराव्या लागणार आहेत. अन्यथा पीएम किसान योजनेचे पैसे बंद होऊ शकतात.

१) ई केवायसी : जर तुम्हाला नवीन वर्षात सुद्धा पीएम किसान योजनेचे पैसे हवे असतील तर सर्वात आधी तुमची ई केवायसी करावी लागेल. कारण अजूनही अनेक शेतकऱ्यांनी त्यांच्या बँक खात्याची ई केवायसी केलेली नाही. परिणामी अनेक शेतकऱ्यांना मागील काही हप्ते मिळाले नसल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. त्यामुळे नवीन वर्षात कोणत्याही अडचणी शिवाय २२ वा हप्ता मिळावा यासाठी शेतकऱ्यांनी तातडीने ई केवायसी करणे गरजेचं आहे. शेतकऱ्यांनी पीएम किसानच्या अधिकृत पोर्टलवर जाऊन



आधार-आधारित ओटीपीच्या माध्यमातून ई-केवायसी पूर्ण करणे आवश्यक आहे.

२) जमिनीच्या नोंदी : दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे जमिनीच्या नोंदी. शेतकऱ्यांच्या नावावर असलेल्या शेतीच्या जमिनीची माहिती पोर्टलवर अचूक आणि अद्ययावत असणे गरजेचे आहे. वारसाहक्क, नोंद दुरुस्ती किंवा नावातील फरक असल्यास पीएम किसान योजनेचा हप्ता अडकण्याची शक्यता असते. त्यामुळे लवकरात लवकर स्थानिक तलाठी किंवा महसूल कार्यालयात जाऊन जमिनीच्या नोंदी तपासा आणि आवश्यक दुरुस्ती करून घ्या.

३) शेतकरी ओळखपत्र : पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेचा लाभ मिळवण्यासाठी सरकारने शेतकऱ्यांनाही फार्मर्स आयडी म्हणजे शेतकरी ओळखपत्र अनिवार्य केलं आहे. हे ओळखपत्र नसेल तर शेतकऱ्यांना पीएम किसान योजनेचा २२ वा हप्ता मिळणार नाही. पीएम किसान योजनेत अलीकडच्या काळात अनेक ठिकाणी चुकीची नोंदणी, अपूर्ण कागदपत्रे आणि अपात्र लाभार्थी यांची संख्या वाढल्याचे आढळून आले होते.

याच पार्श्वभूमीवर सरकारने शेतकरी ओळखपत्र अनिवार्य केलं आहे. हे शेतकऱ्यांचे डिजिटल प्रोफाईल आहे. सरकारकडून शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या योजनांचा फायदा घेण्यासाठी ही ओळख अतिशय महत्वाची आहे. हे एक युनिक ओळखपत्र आहे ज्याच्या आधारे तुम्हाला कोणती योजना लागू होते, किती सबसिडी मिळू शकते, याबद्दल सगळी माहिती समजते.

## डाळिंब बागेवरील कीड-रोग व्यवस्थापन



डाळिंब कीड-रोग व्यवस्थापनासाठी एकात्मिक पद्धतीचा वापर महत्त्वाचा आहे, ज्यात स्वच्छता, जैविक उपाय आणि गरजेनुसार रासायनिक उपाय करणे गरजेचे असते.

किड व्यवस्थापन : विश्रांती काळामध्ये बागेची नियमित पाहणी करावी. बागेमध्ये खोडकिडा, पिन होल बोरर, वाळवी आणि पाने खाणारी अळी यांचा प्रादुर्भाव दिसून आल्यास गरजेनुसार १५ ते २० दिवसांच्या अंतराने योग्य फवारणी करावी. वर सुचविल्याप्रमाणे व्यवस्थापन हे किडींचा प्रादुर्भाव दिसून आल्यावरच करावे. विश्रांती काळामध्ये झाडांना खालीलप्रकारे पेस्ट बनवून लावावी. लाल माती ४ किलो + क्लोरपायरिफॉस (२० ईसी) २० मि.ली. + कॉपर ऑक्सीक्लोराइड (५० डब्ल्यूपी) २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाणी किंवा १०% बोर्डो पेस्ट क्लोरोपायरीफॉस (२० ईसी) २० मि.ली. प्रति १० लिटर पाणी याप्रमाणे वापरुन तयार केलेली पेस्ट झाडाच्या खोडाला जमिनीपासून २-२.५ फुटांपर्यंत लावावी. रसायनांच्या वापरासाठी राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्राने प्रकाशित केलेल्या अॅड-हॉक लिस्टचा वापर केला जाऊ शकतो.

रोग व्यवस्थापन : विश्रांतीच्या काळात १० ते १५ दिवसांच्या अंतराने खालील फवारण्या हवामान आणि पीक समस्यांनुसार घ्याव्यात. १% बोर्डो मिश्रण किंवा कॉपर ऑक्सीक्लोराइड (५० डब्ल्यूपी) २-२.५ ग्रॅम किंवा कॉपर हायड्रॉक्साईड (५३.८ डब्ल्यूपीद) २ ग्रॅम किंवा ब्रोनोपॉल (९५%) ०.५ ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे आलटून-पालटून वापरावीत. बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव आढळल्यासय मॅन्कोझेब (७५ डब्ल्यूपी) २ ग्रॅम प्रति लिटर पाणी किंवा इतर योग्य बुरशीनाशकाची एक फवारणी अॅग्रोकेमिकल्सच्या अॅड-हॉक सूचीमध्ये नमूद केलेल्या बुरशीनाशकांपैकी घेतली जाऊ शकते. बोर्डो मिश्रण सोडून सर्व ओषधांमध्ये फवारणीवेळी चांगल्या प्रतीचे स्टिकर स्प्रेडर ०.२५ मि.ली. प्रति लिटर पाणी याप्रमाणे मिसळावे.

## सेंद्रिय साखरेच्या निर्यातीला परवानगी

दिल्ली / वृत्तसंस्था

केंद्र सरकारने सेंद्रिय साखरेच्या निर्यातीला परवानगी दिली आहे. या साखरेची दरवर्षी ५० हजार टनांपर्यंत निर्यात करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. परराष्ट्र व्यापार महासंचालनालयाने या बाबत अधिकृत अधिसूचना जारी केली आहे. ही निर्यात कृषी आणि प्रक्रिया केलेली अन्न उत्पादने निर्यात विकास प्राधिकरणाच्या (अपेडा) नियमांनुसार होणार आहे.



सरकारने सेंद्रिय साखरेच्या निर्यातीसाठीचे धोरण शिथिल केले आहे. याअंतर्गत दरवर्षी ५० हजार टनांपर्यंत निर्यातीसाठी परवानगी देण्यात आली आहे. २०२३ पासून सेंद्रिय साखरेला मर्यादित श्रेणीत ठेवले होते. २०२३ मध्ये सरकारने अशा साखरेच्या निर्यातीसाठी व्यापाऱ्यांना परवाना घेणे बंधनकारक केले होते. परराष्ट्र व्यापार महासंचालनालयाने (डीजीएफटी) जारी केलेल्या अधिसूचनेत म्हटले आहे, की अपेडाच्या स्वतंत्रपणे निर्धारित नियमांनुसार, प्रत्येक आर्थिक वर्षात एकूण ५० हजार टनांपर्यंत निर्यातीसाठी परवानगी राहील. प्रत्येक आर्थिक वर्षात ५० हजार टनांपर्यंत सेंद्रिय साखरेच्या निर्यातीला परवानगी देण्याचा सरकारचा निर्णय भारतीय साखर उद्योगासाठी एक स्वागतार्ह आणि दूरदृष्टीपूर्ण पाऊल असल्याचे इंडियन शुगर अँड बायो-एनर्जी मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (इस्मा) यांनी म्हटले आहे.

सेंद्रिय साखर म्हणजे काय? : कीडनाशके आणि खतांचा वापर न करता पिकविलेल्या उसापासून सेंद्रिय साखरेचे उत्पादन घेतले जाते. त्यासाठी सेंद्रिय शेती आणि प्रक्रिया मानकांचे पालन करणे अनिवार्य आहे. जेणेकरून त्याची शुद्धता टिकून राहील.

परदेशातून मोठी मागणी : भारतातील एकूण साखर उत्पादनात सेंद्रिय साखर उत्पादनाचे प्रमाण कमी आहे. पण अशा साखरेला अधिक दर मिळतो. तसेच सेंद्रिय आणि 'क्लीन-लेबल' खाद्यपदार्थांच्या वाढत्या वापराच्या पार्श्वभूमीवर अमेरिका, युरोप, आशियातील काही देशांमधून या साखरेला मागणी आहे. सध्या देशात सेंद्रिय साखरेचे उत्पादन मर्यादित स्वरूपात घेतले जाते. यासाठीचे कारखाने आणि निर्यातदारांची संख्या कमी आहे. पण केंद्राच्या अशा साखरेच्या निर्यात धोरणामुळे सेंद्रिय ऊस लागवड, गुंतवणूक वाढेल, अशी आशा 'इस्मा'ने व्यक्त केली आहे.

## सेंद्रिय हळद लागवड

हळद ही झिंगिबेरेसी कुलातील वनस्पती असून तिचे शास्त्रीय नाव कुर्कुमा लोंगा आहे. रासायनिक खतांचा वापर न करता आणि नैसर्गिक पद्धतीने पिकवलेली हळद प्रक्रियेद्वारे अधिक गुणवत्तापूर्ण आणि निर्यातक्षम बनते. भारत हा जगातील सर्वात मोठा हळद उत्पादक देश असून सुमारे ८०% हळद उत्पादन भारतात होते, तर १५ ते २० टक्के हळद निर्यात केली जाते. देशातील एकूण सेंद्रिय शेतीपैकी हळदीचे सेंद्रिय लागवड क्षेत्र सुमारे १.३ लाख हेक्टर असून, यामध्ये महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, तेलंगणा, कर्नाटक, ओडिशा, तामिळनाडु आणि उत्तर-पूर्व राज्यांचा मोठा वाटा आहे. सेंद्रिय हळद उत्पादन दर हेक्टर ६ ते ८ टनांपर्यंत असून, पारंपरिक हळदीच्या तुलनेत यामध्ये उच्च प्रत आणि अधिक औषधी गुणधर्म आढळतात. भौगोलिकदृष्ट्या भारताचे वातावरण हळद लागवडीस अनुकूल असल्याने जम्मू-काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत हळदीची लागवड होऊ शकते. विशेषतः महाराष्ट्रातील हवामान हळद लागवडीस अत्यंत पोषक आहे. राज्यातील हळद उत्पादन प्रामुख्याने सातारा, चंद्रपूर, सांगली, उस्मानाबाद, लातूर, जळगाव, नांदेड, नागपूर, हिंगोली, कोल्हापूर आणि परभणी जिल्ह्यांत होते.

सेंद्रिय हळद प्रक्रिया म्हणजे काय? : सेंद्रिय हळद प्रक्रिया म्हणजे रासायनिक खतांचा व कीटकनाशकांचा वापर न करता नैसर्गिक पद्धतीने हळदीचे उत्पादन आणि प्रक्रिया करणे. या प्रक्रियेमुळे हळदीतील नैसर्गिक औषधी घटक, विशेषतः कुर्कुमीन, टिकून राहतो आणि परिणामी हळद अधिक आरोग्यदायी व गुणकारी बनते.

हळदीची लागवड आणि वाढ : हळदीची लागवड प्रामुख्याने खरीप हंगामात केली जाते. प्रामुख्याने हळद उन्हाळ्याच्या शेवटी किंवा पावसाळ्याच्या सुरुवातीस (मे-जून) लावली जाते. सेंद्रिय पद्धतीने लागवडीसाठी मुख्यतः



गादीवाफे तंत्राचा वापर केला जातो. गादीवाफे म्हणजे सैल, सेंद्रिय घटकयुक्त, १ मीटर रुंदीचे आणि योग्य उंचीचे बेड तयार करून लागवड करण्याची पद्धत आहे, ज्यामुळे पाणी निचरा सुधारतो आणि मुळांचा चांगला विकास होतो.

हवामान आणि माती : हळदीची लागवड समुद्रसपाटीपासून १५०० मीटर उंचीपर्यंत विविध उष्णकटिबंधीय परिस्थितीत, २०-३५ अंश सेल्सिअस तापमानात आणि वार्षिक १५०० मिमी किंवा त्याहून अधिक पाऊस पडतो, पावसावर अवलंबून किंवा सिंचनाखाली करता येते. जरी ते वेगवेगळ्या प्रकारच्या मातीत घेतले जाऊ शकते, तरी ते चांगल्या निचऱ्याच्या वाळू किंवा चिकणमाती मातीत चांगले वाढते ज्यांचे पीएच श्रेणी ४.५-७.५ असते आणि चांगल्या सेंद्रिय स्थितीचे असते.

प्रसार आणि लागवड : लागवडीसाठी संपूर्ण किंवा तुकडे केलेले मातृकंद (मदर राईझोम) आणि बोटासारखे कंद वापरले जातात. शक्यतो, चांगली वाढ झालेली, निरोगी आणि रोगमुक्त कंदमुळे निवडावीत. सेंद्रिय शेतीमध्ये रासायनिक बुरशीनाशकांऐवजी ट्रायकोडर्मा, गोमूत्र किंवा दशपर्णी अर्क यांसारख्या सेंद्रिय बुरशीनाशकांनी कंदमुळे प्रक्रिया करणे फायदेशीर ठरते. प्रक्रिया केलेले कंद सावलीत ३-४ तास वाळवून लागवड करावी. एक हेक्टर क्षेत्रासाठी साधारणतः २,५०० किलो कंदमुळांची बियाणे म्हणून आवश्यकता असते.

खत आणि आच्छादन : शेतखत किंवा कंपोस्ट हे ३० ते ४० टन प्रति हेक्टर या प्रमाणात, जमीन तयार करताना किंवा लागवडीच्या वेळी गादीवाफ्यावर किंवा खड्ड्यांत बेसल ड्रेसिंग म्हणून मिसळले जाते. तसेच, केक (जसे की निंबोळी पेंड किंवा तीळ पेंड) यासारखी सेंद्रिय खते २ टन प्रति हेक्टर या दराने वापरता येतात. अशा वेळी शेणखताचे प्रमाण थोडे कमी करता येते. लागवडीनंतर लगेचच, हिरव्या पानांचे (जसे की गवत, मक्याचे पाने इ.) आच्छादन सुमारे १२ ते १५ टन प्रति हेक्टर या प्रमाणात करणे गरजेचे असते, जेणेकरून मातीतील ओलावा टिकून राहील आणि तणांचा प्रादुर्भाव कमी होईल. यानंतर, लागवडीनंतर ४० व ९० दिवसांनी तणनियंत्रण आणि माती चढवण्याच्या प्रक्रियेनंतर, आच्छादनाची पुनरावृत्ती ७.५ टन प्रति हेक्टर या प्रमाणात केली जाते.

खुरपणी आणि सिंचन : तणांच्या तीव्रतेनुसार लागवडीनंतर ६०, ९० आणि १२० दिवसांनी तीनदा खुरपणी करावी लागते. बागायती पिकाच्या बाबतीत, हवामान आणि मातीच्या परिस्थितीनुसार, चिकणमाती जमिनीत सुमारे १५ ते २३ आणि वाळूच्या चिकणमाती जमिनीत ४० सिंचन द्यावे लागतात. सिंचनासाठी प्रामुख्याने ठिबक सिंचन पद्धतीचा वापर केला जातो, जेणेकरून पाण्याचा योग्य वापर होईल.

हळदीची काढणी : सेंद्रिय हळदीची काढणी योग्य वेळी आणि शास्त्रशुद्ध पद्धतीने करणे अत्यंत महत्त्वाचे असते. चांगल्या पद्धतीने व्यवस्थापित केलेले हळदीचे पीक पेरणीच्या प्रकारानुसार आणि वेळेनुसार सात ते नऊ महिन्यांत काढणीसाठी तयार होते. साधारणपणे जानेवारी ते मार्च दरम्यान हळदीची काढणी केली जाते. परिपक्व झाल्यावर, पाने सुकतात आणि हलक्या तपकिरी ते पिवळ्या रंगाची होतात. जेव्हा हळदीची पाने वाळून पिवळी पडतात, तेव्हा ती उपटून बाहेर काढली जाते. हळदीचे कंद व्यवस्थित काळजीपूर्वक काढले जातात. हळदीची काढणी अथवा खोदणी करताना चुकून कंदांना इजा झाली तर त्याचा हळदीच्या प्रतीवर आणि विक्रीवर विपरीत परिणाम होऊ शकतो.




### महत्वाच्या घटना

१७५७ : प्लासीच्या लढाईत इंग्रजांनी बंगालच्या नबाबाचा पराभव केला. या विजयामुळे ईस्ट इंडिया कंपनी सरकारचा पाया घातला गेला आणी ब्रिटिश इस्ट इंडिया कंपनीने कोलकाता काबीज केले.
१८३९ : लुई दागुएरे यांनी चंद्राचा पहिला फोटो प्रदर्शित केला होता.
१८८१ : लोकमान्य टिळकांनी संपादित केलेल्या 'मराठा' या दैनिकाची सुरूवात झाली.
१८८५ : पुणे यथे फर्ग्युसन महाविद्यालय सुरू झाले.
१९०५ : मांचुरियातील पोर्ट ऑर्थर सिटी येथील लढाईत जपानी सैन्याने रशियाचा पाडाव केला. आशियाई देशाने युरोपातील देशाचा केलेला पराभव ही त्या काळातील अतिशय महत्त्वाची घटना होती.
१९३६ : मध्य प्रदेश उच्च न्यायालयाची स्थापना
१९४२ : दुसरे महायुद्ध जपानी फौजांनी मनिला, फिलिपाइन्सवर ताबा मिळवला.
१९४५ : दुसरे महायुद्ध दोस्त राष्ट्रांनी न्यूरेम्बर्ग, जर्मनी येथे तुफानी बॉम्बवर्षाव केला.
१९५४ : राष्ट्रपती डॉ. राजेन्द्रप्रसाद यांनी 'भारतरत्न' पुरस्कारांची स्थापना केली.
१९८५ : पुणे येथील फर्ग्युसन महाविद्यालयाच्या शताब्दी निमित्ताने टपाल तिकिटाचे प्रकाशन.
१९८९ : मार्क्सवादी विचारसरणीचे पथनाट्यकार, लेखक, दिगदर्शक, कवि आणि गीतकार सफदर हश्मी यांची नवी दिल्ली येथे पथनाट्य करत असतानाच निर्घृण हत्या
१९९१ : तिरुअनंतपुरम च्या विमानतळाला आंतराष्ट्रीय चा दर्जा देण्यात आला.
१९९८ : डॉ. सरोजिनी बाबर यांना पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. वसंत गोवारीकर यांच्या हस्ते सन्माननीय डी. लिट. पदवी प्रदान
१९९९ : अमेरिकेत हिमवादळात मिल वॉकीमध्ये१४ इंच टर शिकोगामध्ये १९ इंच हिम पडला. शिकागोचे तापमान -१३ इतके कमी झाले.
२००० : संत ज्ञानेश्वरांची प्रतिमा असलेल्या चलनी नाण्याचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या हस्ते प्रकाशन.
२००० : पनामा सरकारने ८५ वर्षांच्या कालखंडानंतर पनामा कालव्याचा पूर्ण ताबा घेतला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८७८ : भारताचेपद्मभूषण पुरस्कारविजेते मन्नत्तु पद्मनाभन यांचा जन्म.
१९०५ : भारताचेपद्मभूषण पुरस्कारविजेते जैनेंद्र कुमार यांचा जन्म.
१९०६ : भारतातील प्रसिद्ध उद्योगपती डी. एन. खुरोदे यांचा जन्म.
१९२० : आयझॅक असिमॉव्ह अमेरिकन जीवरसायनशास्त्रज्ञ आणि विज्ञानकथालेखक (मृत्यू: ६ एप्रिल १९९२)
१९३२ : हरचंदसिंग लोंगोवाल अकाली दलाचे अध्यक्ष (मृत्यू: २० ऑगस्ट १९८५)
१९३२ : भारतीय चित्रपट निर्माते जॉनी बक्षी यांचा जन्म.
१९४० : अमेरिकी-भारतीय वैज्ञानिक एस. आर.श्रीनिवास वर्धन यांचा जन्म.
१९५९ : किर्ती आझाद क्रिकेटपटू आणि खासदार
१९६० : रमण लांबा क्रिकेटपटू (मृत्यू: २३ फेब्रुवारी १९९८)
१९७० : स्विमर बुला चौधरी यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१३१६ : अल्लाउद्दीन खिलजी दिल्लीचा सुलतान
१९३५ : मोरेश्वर वासुदेव तथा नरकेसरी अभ्यंकर स्वातंत्र्यसैनिक, टिळकांच्या विचारसरणीचे मध्य प्रांताचे काँग्रेस नेते, वकील (जन्म: १९ ऑगस्ट १८८६)
१९४३ : हुतात्मा वीर भाई कोतवाल
१९४४ : महर्षि विठ्ठल रामजी शिंदे अस्पृश्यता निवारण हे जीवनध्येय मानलेले व्यासंगी समाजसुधारक (जन्म: २३ एप्रिल १८७३)
१९५० : समाज सेविका तसेच स्वातंत्र्य सैनिकांमधील एक डॉ.राधाबाई यांचे निधन.
१९५२ : व्यक्तींचे पुतळे करणारे महान शिल्पकार जो डेव्हिडसन यांचे निधन.
१९८८ : भारतीय चित्रपट सृष्टीचे कलाकार अन्वर हुसेन यांचे निधन.
१९८९ : सफदर हश्मी मार्क्सवादी विचारसरणीचे पथनाट्यकार, लेखक, दिगदर्शक, कवि आणि गीतकार (जन्म: १२ एप्रिल १९५४)
१९९९ : विमला फारुकी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या नेत्या आणि महिला चळवळीतील कार्यकर्त्या
२००२ : अनिल अग्रवाल पर्यावरणवादी (जन्म: १९४७)
२०१० : गुजराती कवी राजेंद्र शहा यांचे निधन.
२०१५ : भारतीय शास्त्रज्ञ वसंत गोवारीकर यांचे निधन.

## शेळ्या मेंढ्यांना होणारा 'निळी जीभ आजार; कारणे, लक्षणे आणि उपाय!

जनावरांना होणारा निळी जीभ आजार प्रामुख्याने ऑक्टोबर, नोव्हेंबर आणि डिसेंबर महिन्यात होतो. हा रोग मुख्यतः शेळ्या आणि मेंढ्यांना होतो, गुरेढोरे फार क्वचितच या आजाराने प्रभावित होतात. विषाणूमुळे होणारा हा रोग संसर्गजन्य नसला तरी एक वर्षाच्या वयोगटातील कोवळ्या शेळ्या, मेंढ्यांना या रोगाचा धोका असतो. दूध पिणारी कोकरू तुलनेने या रोगास प्रतिरोधक असतात.

निळी जीभ आजाराची कारणे : ओरबीव्हायरस नावाच्या विषाणूमुळे हा रोग होतो. पावसाळ्यातील रक्त शोषणाऱ्या कीटकापासून या रोगाचे विषाणू पसरतात. डासामार्फत सुद्धा या रोगाचा प्रसार होतो. वीर्य आणि प्लेसेंटल मार्गाद्वारे सुद्धा संक्रमण होऊ शकते.

निळी जीभ आजाराची लक्षणे : या आजारात जनावरांना ताप येतो, नाकातून स्त्राव येऊन नाक लाल होते, सुजते. तोंडातून लाळ येऊन जीभ काळी- निळी पडते. खुरांना सूज येते व ते लंगडायला लागतात. दुर्गंधीयुक्त अतिसार होऊन जनावरे मलूल होतात. जनावरांना श्वास घ्यायला त्रास होतो, ते घोरतात. श्वसनक्रिया बंद पडल्यास मृत्यू सुद्धा होऊ शकतो.

आजारावर प्रथमोपचार व उपचार : सर्वात प्रथम आजारी जनावरांना वेगळे करावे व त्यांना सूर्यप्रकाशापासून दूर ठेवावे. बाधित जनावरांना पुरेशी विश्रांती द्यावी, चरायला पाठवू नये. बाधित जनावरांना तांदूळ, नाचणी, यांची लापशी खाऊ घालावी.



शुक्रवार दि.२ जानेवारी २०२६ ५

राज्य लोकतंत्र
# मराठवाडा वृत्तांत



# नगर जिल्ह्यासह राज्यातील १४ हजार मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींवर अधिकारी नको

## विद्यमान सरपंचांनाच 'प्रशासक' किंवा 'केअरटेकर' ठेवा

अहिल्यानगर। प्रतिनिधी

राज्यातील ग्रामीण लोकशाहीचा कणा असलेल्या ग्रामपंचायतींच्या अस्तित्वाचा आणि गावच्या विकासाचा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे. फेब्रुवारी २०२६ मध्ये राज्यातील सुमारे १४,२३४ तर, अहिल्यानगर जिल्ह्यातील ७६७ पेक्षा अधिक ग्रामपंचायतींची मुदत संपणार आहे. त्यामुळे, निवडणुका होईपर्यंत, गावगाडा विस्कळीत होऊ नये आणि लोकशाही मूल्यांचे जतन व्हावे, यासाठी मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींवर सरकारी अधिकारी प्रशासक म्हणून न नेमता, विद्यमान सरपंचांनाच 'प्रशासक' किंवा 'केअरटेकर' म्हणून मुदतवाढ द्यावी, अशी ऐतिहासिक मागणी सरपंच सेवा संघाच्या वतीने राज्यपालांकडे करण्यात आली आहे.

संघटनेचे प्रदेशाध्यक्ष आणि सरपंच चळवळीचे नेतृत्व बाबासाहेब पावसे पाटील यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने राज्यपालांची भेट घेऊन त्यांचे लक्ष वेधले आहे. राज्यपालांशी संवाद साधताना, बाबासाहेब पावसे पाटील यांनी अत्यंत परखडपणे ग्रामीण भागातील समस्या मांडल्या. ते म्हणाले, राज्यात एकाच वेळी १४ हजारांहून अधिक ग्रामपंचायतींची मुदत संपत आहे. जर या ठिकाणी सरकारी पगारी नोकरांची प्रशासक म्हणून नियुक्ती केली, तर एका अधिकाऱ्याकडे किमान १० ते १५ गावांचा पदभार येईल. अशा परिस्थितीत तो अधिकारी गावातील जनतेला वेळ देऊ शकणार नाही. सामान्य नागरिकांना साध्या दाखल्यांसाठी किंवा तक्रारींसाठी तालुक्याच्या ठिकाणी हेलपाटे मारावे लागतील. ज्या सरपंचांनी पाच वर्षे अहोरात्र कष्ट करून गावचा विकास केला, त्यांनाच ही जबाबदारी दिल्यास लोकशाहीचा सन्मान होईल. फेब्रुवारी आणि मार्च हा काळ आर्थिक वर्ष संपण्याचा असतो. सध्या राज्यातील हजारो गावांमध्ये १५ व्या वित्त आयोगाचा निधी, जलजीवन मिशन आणि जिल्हा नियोजनाची महत्त्वाची कामे प्रगतीपथावर आहेत. मार्चअखेर ही कामे पूर्ण करून निधी खर्च करणे आवश्यक असते. जर या काळात नवीन प्रशासक आला, तर त्याला कामाचे स्वरूप आणि तांत्रिक बाजू समजून घेण्यातच वेळ जाईल. परिणामी, कोट्यवधी रुपयांचा विकासनिधी अखर्चित राहून परत जाण्याची भीती आहे. याचा थेट फटका ग्रामीण भागातील विकासकामांना बसेल. फेब्रुवारीनंतर राज्यात उन्हाळ्याची तीव्रता वाढते. अनेक गावांना पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. अशा आपत्कालीन परिस्थितीत टँकरचे नियोजन, विहीर अधिग्रहण आणि स्थानिक पाणीपुरवठ्याचे प्रश्न सोडवण्यासाठी जनतेने निवडलेला प्रतिनिधी (सरपंच) जेवढ्या प्रभावीपणे काम करू शकतो, तेवढे सरकारी कर्मचारी करू शकणार नाहीत, असा दावा सरपंच सेवा संघाने केला आहे. या निवेदनावर राज्यातील विविध जिल्ह्यांतील सरपंच प्रतिनिधी आणि सरपंच सेवा संघाच्या पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. आता या संवेदनशील विषयावर राज्यपाल आणि राज्य सरकार काय पाऊल उचलणार, याकडे ग्रामीण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. सरपंच सेवा संघाने आपल्या निवेदनात स्पष्ट इशारा दिला आहे की, जर राज्य सरकारने सरपंचांच्या या रास्त मागणीचा गांभीर्याने विचार केला नाही, तर संपूर्ण महाराष्ट्रात बाबासाहेब पावसे यांच्या नेतृत्वाखाली तीव्र आंदोलन छेडले जाईल. हा लढा केवळ सरपंचांच्या अधिकाराचा नसून, गावाच्या अस्मितेचा आणि विकासाचा आहे, असे संघटनेने म्हटले आहे.

---

**जिल्हा ग्राहक तक्रार निवारण न्यायमंच**
**बीड जिल्हा कार्यालय**
**शाहूनगर, पांगरी रोड, बीड– ४३१ १२२**
**दिनांक १० नोव्हेंबर, २०२५**
**जा.क्र.जि.ग्रा.मं/बीड / १७८५**

### जाहिर प्रगटन

CONSUMER CASE NO. DC/470/CC/341/2025
ROHAN DINKAR SHENDGE S/o.
Versus
DNYANRADHA MULTISTATE CO OP CREDIT SO.LTD.

To,
Opposite Party / Respondent Name:
1. DNYANRADHA MULTISTATE CO OP CREDIT SO.LTD. MAIN BRANCH GNANARADHA BHAWAN, JALNA ROAD, BEED TO DIST BEED, MAHARASHTRA BEED-431122 2. SURESH DNYANOBA KUTE CHAIRMAN GYANRADHA MULTISTATE CO OP CREDIT SO.LTD. NEAR CHAMADA FAKTI, MIDC. BEED DIST. BEED-431122, MAHARASHTRA BEED-431122 3. YASHWANT V. KULKARNI VOICE CHAIRMAN DNYANARADHA MULTISTATE CO OP CREDIT SO.LTD. BRANCH DHANORA ROAD, BEEDTQ AND DISTRICT BEED, MAHARASHTRA BEED-431122 4. BRANCH MANAGER DNYANRADHA MULTISTATE CO OP CREDIT SO.LTD BRANCH DHANORA ROAD, BEED TQ DISTRICT BEED, MAHARASHTRA BEED-431122 5. SAMRUDH JANARDHAN JADHAV DEPUTY REGISTRAR OFFICE OF THE DEPUTY REGISTRAR, BEED DIST. BEED, MAHARASHTRA BEED-431122

वर नमुद तक्रारदार यांना विरुध्द पक्ष यांच्या विरुध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झालयामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीस व्दारे आपणास कळविण्यात येते की, विरुध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक २१/०१/२०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता स्वता. अगर वकिल किंवा प्राधिकृत प्रतिनिधि मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुध्द पक्षांनी याकामी कसूर केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फी आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मा. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार.

दिनांक ०४/११/२०२५
ठिकाण – बीड

स्वाक्षरीत
**प्रबंधक**
जिल्हा ग्राहक तक्रार
निवारण आयोग, बीड.

---

**जिल्हा ग्राहक तक्रार निवारण न्यायमंच**
**बीड जिल्हा कार्यालय**
**शाहूनगर, पांगरी रोड, बीड– ४३१ १२२**
**दिनांक २३ डिसेंबर २०२५**
**जा.क्र.जि.ग्रा.मं/बीड / २३१६**

### जाहिर प्रगटन

CONSUMER CASE NO. DC/470/CC/309/2025
SHRIKRUSHNA UDHHAVRAO AJAB
Versus
DNYANARADHA MULTISTATE CO OP CREDIAT SOCIETY LTD

To.
Opposite Party / Respondent Name:
1. DNYANARADHA MULTISTATE CO OP CREDIAT SOCIETY LTD MAIN BRANCH DNYANARADHA BHAVAN, JALNA ROAD, BEED, MAHARASHTRA BEED-431122 2. SURESH DNYANOBA KUTE CHAIRMAN DNYANRADHA MULTISTATE CO OP CREDIT SO.LTD. CHAMDA FACTORY MIDC ROAD, TQ. DIST. BEED, MAHARASHTRA BEED-431122 3. YASHWANT V. KULKARNI VOICE CHAIRMAN DNYANARADHA MULTISTATE CO OP CREDIT SO.LTD. DHANORA ROAD, BEED TQ. DIST. BEED, MAHARASHTRA BEED-431122

वर नमुद तक्रारदार यांना विरुध्द पक्ष यांच्या विरुध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झालयामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीस व्दारे आपणास कळविण्यात येते की, विरुध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक २८/०१/२०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता स्वता. अगर वकिल किंवा प्राधिकृत प्रतिनिधि मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुध्द पक्षांनी याकामी कसूर केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फी आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मा. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार.

दिनांक २३/१२/२०२५
ठिकाण – बीड

स्वाक्षरीत
**प्रबंधक**
जिल्हा ग्राहक तक्रार
निवारण आयोग, बीड.

---

**जिल्हा ग्राहक तक्रार निवारण न्यायमंच**
**बीड जिल्हा कार्यालय**
**शाहूनगर, पांगरी रोड, बीड– ४३१ १२२**
**दिनांक १० नोव्हेंबर, २०२५**
**जा.क्र.जि.ग्रा.मं./बीड / १७८७**

### जाहिर प्रगटन

CONSUMER CASE NO. DC/470/CC/470/2024
BHAGWAT ASHRUBA GILBILE
Versus
DNYANRADHA MULTISTATE CO-OP CREDIT SO.LTD

To.
Opposite Party / Respondent Name:
1. DNYANRADHA MULTISTATE CO-OP CREDIT SO.LTD MAIN BRANCH DNYANARADHA BHAWAN, JALNA ROAD, BEED DISTT. BEED.431122, MAHARASHTRABEED- 2. CHAIRMAN SURESH DNYANOBA KUTE NEAR CHADA FAKTI M.I.D.C. BEED DIST. BEED., MAHARASHTRABEED- 3. DNYANRADHA MULTISTATE CO-OP CREDIT SO.LTD NEAR WATER TANK, OLD MONDA MAJALGAON TQ. MAJALGAON DISTRICT BEED, MAHARASHTRABEED

वर नमुद तक्रारदार यांना विरुध्द पक्ष यांच्या विरुध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झालयामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीस व्दारे आपणास कळविण्यात येते की, विरुध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक २१/०१/२०२६, रोजी सकाळी १०:३० वाजता स्वता. अगर वकिल किंवा प्राधिकृत प्रतिनिधि मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुध्द पक्षांनी याकामी कसूर केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फी आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मा. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार.

दिनांक ०४/११/२०२५
ठिकाण – बीड

स्वाक्षरीत
**प्रबंधक**
जिल्हा ग्राहक तक्रार
निवारण आयोग, बीड.

---

**जिल्हा ग्राहक तक्रार निवारण न्यायमंच**
**बीड जिल्हा कार्यालय**
**शाहूनगर, पांगरी रोड, बीड– ४३१ १२२**
**दिनांक १० नोव्हेंबर, २०२५**
**जा.क्र.जि.ग्रा.मं/बीड / १७८८**

### जाहिर प्रगटन

CONSUMER CASE NO. DC/470/CC/342/2025
RATNAMALA DINKAR SHENDAGE
Versus
DNYANARADHA MULTISTATE CO OP CREDIAT SOCIETY LTD

To.
Opposite Party / Respondent Name:
DNYANARADHA MULTISTATE CO OP CREDIAT SOCIETY LTD 1. DNYANARADHA BHAVAN JALNA RODA, BEED TQ. DIST. BEED, MAHARASHTRABEED-431122 2. SURESH DNYANOBA KUTE PRESIDENT DNYANRADHA MULTISTATE CO.OP. CREDIT SOCIETY LTD. CHAMADA FACTORY, MIDC BEED TQ. DIST. BEED, MAHARASHTRABEED-431122 3. YASHVANT VASANTRAO KULKARNI VICE CHAIRMAN DNYANRADHA MULTISTATE CO. OP. CREDIT SOCIETY LTD. BEHIND HONDA SHOWROOM, JALNA ROAD,, MAHARASHTRA BEED -431122 4. BRANCH MANAGER DNYANRADHA MULTISTATE CO. OP. CREDIT SOCIETY LTD. DHANORA ROAD, BEED TQ. DIST. BEED, MAHARASHTRABEED-431122 5. SAMRUT JANARDHAN JADHAV LIQUIDATOR DNYANRADHA MULTISTATE CO. OP. CREDIT SOCIETY LTD. SAHKARI SHAKTI BUILDING, 1ST FLOOR,, MAHARASHTRABEED-431122

वर नमुद तक्रारदार यांना विरुध्द पक्ष यांच्या विरुध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झालयामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीस व्दारे आपणास कळविण्यात येते की, विरुध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक २१/०१/२०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता स्वता. अगर वकिल किंवा प्राधिकृत प्रतिनिधि मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुध्द पक्षांनी याकामी कसूर केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फी आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मा. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार.

दिनांक ०४/११/२०२५
ठिकाण – बीड

स्वाक्षरीत
**प्रबंधक**
जिल्हा ग्राहक तक्रार
निवारण आयोग, बीड.

---

**जिल्हा ग्राहक तक्रार निवारण न्यायमंच**
**बीड जिल्हा कार्यालय**
**शाहूनगर, पांगरी रोड, बीड– ४३१ १२२**
**दिनांक १० नोव्हेंबर, २०२५**
**जा.क्र.जि.ग्रा.मं./बीड / १७८३**

### जाहिर प्रगटन

CONSUMER CASE NO. DC/470/CC/531/2024
SHRIRAM MAHADEV SURATKAR
Versus
DNYANRADHA MULTISTATE CO-OP CREDIT SO.LTD.

To.
Opposite Party / Respondent Name:
1. DNYANRADHA MULTISTATE CO-OP CREDIT SO.LTD.
MAIN BRANCH DNYANARADHA BHAWAN, JALNA ROAD, BEED DISTT.
BEED.431122, MAHARASHTRA BEED-
2. CHAIRMAN SURESH DNYANOBA KUTE DNYANARADHA MULTISTATE CO-
OP CREDIT SO.LTD NEAR CHAMADA FAKDI, M.I.D.C. BEED DIST. BEED, MAHARASHTRBEED-
3. BRANCH MANAGER DNYANRADHA MULTISTATE CO-OP CREDIT SO.LTD. SARDA COMPLEX, BEED DIST. BEED 43112, MAHARASHTRA BEED-

वर नमुद तक्रारदार यांना विरुध्द पक्ष यांच्या विरुध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झालयामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीस व्दारे आपणास कळविण्यात येते की, विरुध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक २१/०१/२०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता स्वता. अगर वकिल किंवा प्राधिकृत प्रतिनिधि मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुध्द पक्षांनी याकामी कसूर केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फी आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मा. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार.

दिनांक ०४/११/२०२५
ठिकाण – बीड

स्वाक्षरीत
**प्रबंधक**
जिल्हा ग्राहक तक्रार
निवारण आयोग, बीड.

---

**जिल्हा ग्राहक तक्रार निवारण न्यायमंच**
**बीड जिल्हा कार्यालय**
**शाहूनगर, पांगरी रोड, बीड– ४३१ १२२**
**दिनांक १० नोव्हेंबर, २०२५**
**जा.क्र.जि.ग्रा.मं./बीड / १७८९**

### जाहिर प्रगटन

CONSUMER CASE NO. DC/470/CC/337/2025
KETAN DINKAR SHENDGE
Versus
DNYANRADHA MULTISTATE CO OP CREDIT SO.LTD.

To.
Opposite Party / Respondent Name:
1. DNYANRADHA MULTISTATE CO OP CREDIT SO.LTD. MAIN BRANCH GNANARADHA BHAWAN, JALNA ROAD, BEED, MAHARASHTRA BEED-431122 2. SURESH DNYANOBA KUTE CHAIRMAN GYANRADHA MULTISTATE CO OP CREDIT SO.LTD. NEAR CHAMADA FAKTI, MIDC. BEED DISTT. BEED-431122, MAHARASHTRA BEED-431122 3. YASHWANT V. KULKARNI VOICE CHAIRMAN DNYANARADHA MULTISTATE CO OP CREDIT SO.LTD. BRANCH DHANORA ROAD, BEED TOWN AND DISTRICT BEED, MAHARASHTRA BEED-431122 4. BRANCH MANAGER DNYANRADHA MULTISTATE CO OP CREDIT SO.LTD BRANCH DHANORA ROAD, BEED TQ DISTRICT BEED, MAHARASHTRA BEED-431122 5. SAMRUDH JANARDHAN JADHAV DEPUTY REGISTRAR OFFICE OF THE DEPUTY REGISTRAR, BEED DIST. BEED, MAHARASHTRA BEED-431122

वर नमुद तक्रारदार यांना विरुध्द पक्ष यांच्या विरुध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झालयामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीस व्दारे आपणास कळविण्यात येते की, विरुध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक २१/०१/२०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता स्वता. अगर वकिल किंवा प्राधिकृत प्रतिनिधि मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुध्द पक्षांनी याकामी कसूर केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फी आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मा. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार.

दिनांक ०४/११/२०२५
ठिकाण – बीड

स्वाक्षरीत
**प्रबंधक**
जिल्हा ग्राहक तक्रार
निवारण आयोग, बीड.

---

**जिल्हा ग्राहक तक्रार निवारण न्यायमंच**
**बीड जिल्हा कार्यालय**
**शाहूनगर, पांगरी रोड, बीड– ४३१ १२२**
**दिनांक १० नोव्हेंबर, २०२५**
**जा.क्र.जि.ग्रा.मं/बीड / १७८२**

### जाहिर प्रगटन

CONSUMER CASE NO. DC/470/CC/340/2025
PARVATI UDDHAV AJAB
Versus
GANGABHARATI MAHARAJ GRAMIN BIGARSHETI SAH PATSANSTHA MARYADIT

To.
Opposite Party / Respondent Name:
1. SUBHASH VITTHALRAO SHINDE GANGABHARATI MAHARAJ GRAMIN
BIGARSHETI SAH PATSANSTHA MARYADIT
BARSHI ROAD, GANPATI NAGAR, BEED TQ.DIST.BEED, MAHARASHTRA
BEED-431122
2. ?????HAU NIVRUTTI MASKAR GANGABHARATI MAHARAJ GRAMIN
BIGARSHETI SAH PATSANSTHA MARYADIT
SWARAJ NAGAR, CIRCLE GROUND BEHIND BEED, MAHARASHTRA
BEED-431122

वर नमुद तक्रारदार यांना विरुध्द पक्ष यांच्या विरुध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झालयामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीस व्दारे आपणास कळविण्यात येते की, विरुध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक १५/०१/२०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता स्वता. अगर वकिल किंवा प्राधिकृत प्रतिनिधि मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुध्द पक्षांनी याकामी कसूर केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फी आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मा. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार.

०४/११/२०२५ दिनांक
ठिकाण – बीड

स्वाक्षरीत
**प्रबंधक**
जिल्हा ग्राहक तक्रार
निवारण आयोग, बीड.

---

**जिल्हा ग्राहक तक्रार निवारण न्यायमंच**
**बीड जिल्हा कार्यालय**
**शाहूनगर, पांगरी रोड, बीड– ४३१ १२२**
**दिनांक १० नोव्हेंबर, २०२५**
**जा.क्र.जि.ग्रा.मं/बीड / १७८४**

### जाहिर प्रगटन

CONSUMER CASE NO. DC/470/CC/537/2024
RAJESH VISHWASRAO SOLANKE
Versus
DNYANRADHA MULTISTATE CO-OP. CREDIT SOCIETY LTD.

To.
Opposite Party / Respondent Name:
1. DNYANRADHA MULTISTATE CO-OP. CREDIT SOCIETY LTD. HEAD BRANCH-DNYANRADHA BHAVAN, JALNA ROAD, BEED, TQ. BEED, MAHARASHTRA BEED- 2. SURESH S/O. DNYANOBA KUTE, PRESIDENT, DNYANRADHA MULTISTATE CO-OP. CREDIT SOCIETY LTD R/O. NEAR CHAMADA FACTORY, M.I.D.C., BEED, TQ. BEED, MAHARASHTRA BEED- 3. DNYANRADHA MULTISTATE CO-OP. CREDIT SOCIETY LT NEAR WATER TANK OLD MONDHA MAJALGAON TQ DIST BEED, MAHARASHTRA BEED- 4. VASANT SHANKARAO SATALE ASHISH DRESSES SUBHAS ROAD BEED, MAHARASHTRA BEED- 5. DADARAO HARIDAS UNDARE GARKHEDA AURANGABAD,, MAHARASHTRA BEED- 6. BHASKAR RAMRAO LONDHE SHAHU NAGAR BEED, T. DISTRICT BEED, MAHARASHTRA BEED- 7. SURESH ATMARAM GAVANE KARANJA ROAD, BEED DISTRICT BEED, MAHARASHTRA BEED- 8. YASHWANT VASANTRAO KULKARNI, SHINDE NAGAR, BEED. DISTRICT BEED, MAHARASHTRA BEED-

वर नमुद तक्रारदार यांना विरुध्द पक्ष यांच्या विरुध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झालयामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीस व्दारे आपणास कळविण्यात येते की, विरुध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक २१/०१/२०२६, रोजी सकाळी १०:३० वाजता स्वता. अगर वकिल किंवा प्राधिकृत प्रतिनिधि मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुध्द पक्षांनी याकामी कसूर केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फी आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मा. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार.

दिनांक ०४/११/२०२५
ठिकाण – बीड

स्वाक्षरीत
**प्रबंधक**
जिल्हा ग्राहक तक्रार
निवारण आयोग, बीड.

---

# सोनोग्राफी सुरू करण्याची मागणी

जालना

जिल्ह्यातील सरकारी दवाखाना रुग्णालयात गेल्या अनेक महिन्यांपासून सोनोग्राफी सेवा बंद असल्याने गरीब, दिनदुबळे, दलित, मागासवर्गीय तसेच खेड्यापाड्यातून येणाऱ्या रुग्णांना प्रचंड अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

सोनोग्राफी ही गर्भवती महिला, अपघातग्रस्त, गंभीर आजारग्रस्त रुग्णांसाठी अत्यावश्यक तपासणी असताना, ही सेवा बंद असल्यामुळे रुग्णांना खासगी रुग्णालयांकडे धाव घ्यावी लागत आहे. त्यामुळे आर्थिक खर्च वाढत असून अनेक गरजू कुटुंबांना उपचार अर्ध्यावर सोडावे लागत आहेत. तरंग कांबळे यांनी वैद्यकीय अधीक्षकांना दिलेल्या निवेदनात सोनेग्राफी चालू करा अशी मागणी करण्यात आली भारतीय संविधान कलम २१ नुसार प्रत्येक नागरिकाला जीवनाचा व आरोग्य सेवेचा अधिकार आहे. सोनोग्राफीसारखी मूलभूत सुविधा बंद ठेवणे हे मानवाधिकारांचे उल्लंघन आहे. रुग्णांना आरोग्यसेवेपासून वंचित ठेवणे गंभीर बाब असून त्याची जबाबदारी प्रशासनावर येते. राष्ट्रीय मानवाधिकार आयोग महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोग जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हाधिकारी, जिल्हा रुग्णालय प्रशासन तसेच शासन नियमांनुसार निवेदनाची तात्काळ दखल घेऊन प्रतीक देणे बंधनकारक असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. प्रशासनाने तात्काळ हस्तक्षेप करून सोनोग्राफी सेवा सुरू करावी, अशी जोरदार मागणी केली.

# ‘ऑपरेशन न्यू इयर अंतर्गत’ बीड पोलिसांनी केले साडे सतरा लाख वसूल

## जिल्हाभरात १०३ ठिकाणी छापे, एका ठिकाणी गुटखा जप्त तर ३०० वाहन चालकांवर कारवाई

**बीड । प्रतिनिधी**

**नवीन वर्षाच्या स्वागतासाठी जिल्ह्यामध्ये आनंदी वातावरण रहावे यासाठी पोलिसांनी दिनांक २९ डिसेंबर२०२५ पासूनच सर्व ठिकाणी नाकाबंदी आणि पेट्रोलिंग सुरू केली होती. या अंतर्गत पोलिसांनी अवैध दारू, गुटखा आणि मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकावर कारवाई करून १७ लाख ४३ हजार ५१९ रुपये दंड वसूल केला. यामध्ये अवैध दारूचा मुद्देमाल जप्त करून नऊ लाख २६ हजार ७२५ रुपये, राज्यात प्रतिबंधित असलेला गुटखा जप्त करून पाच लाख ३२ हजार ५९४ रुपये तर दारू पिऊन वाहन चालवणाऱ्या ३२ वाहन चालकावर तसेच वाहन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या ३०० वाहन चालकावर कारवाई करून दोन लाख ८४ हजार दोनशे रुपये वसूल केले.**



बीड जिल्ह्यातील नागरिकांना नवीन वर्षाचे स्वागत उत्साहात आणि चांगल्या वातावरणात करता यावे म्हणून पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी दिनांक २९ डिसेंबर २०२५ ते १ जानेवारी २०२६ च्या पहाटेपर्यंत ऑपरेशन न्यू इयर राबवण्याचे आदेश दिले. या उपक्रमाचा मूळ हेतू नागरिक आणि महिलांना सुरक्षा मिळावी असा होता. जिल्ह्यातील पोलीस दलाच्या वतीने जिल्हाभरात नाकाबंदी, पेट्रोलिंग करून दारू पिऊन भांडण करणारे, अवैध दारू विक्रेते, दारू पिऊन वाहन चालवणारे, विना हेल्मेट वाहन चालवणारे, ट्रिपल सीट वाहन चालणारे, विना सीट बेल्ट वाहन चालवणारे, अशा वाहन चालकावर कारवाई केली. दिनांक २९ डिसेंबर २०२५ पासून बीड जिल्ह्यामध्ये १०३ ठिकाणी छापे टाकून अवैध दारू जप्त करण्यात आली. ही दारू नऊ लाख २६ हजार ७२५ रुपये किमतीची आहे. याबरोबरच धारूर पोलीस ठाण्याच्या अंतर्गत राज्यात प्रतिबंधित असलेला गुटखा ज्याची किंमत पाच लाख ३२ हजार ५९४ इतकी आहे. हा गुटखा जप्त करण्यात आला. जिल्ह्यामध्ये ३२ ईसम हे दारू पिऊन वाहन चालवताना आढळून आल्याने त्यांच्याविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले. तसेच मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या ३०० वाहन चालकावर कारवाई करून त्यांच्याकडून दोन लाख ८४ हजार दोनशे रुपये दंड वसूल करण्यात आला. याचा परिणाम म्हणून नववर्षाच्या पूर्वसंध्येला कुठलीही मारामारीची किंवा गंभीर घटना घडली नाही. एकही अपघात घडला नाही. त्यामुळे ऑपरेशन न्यू इयर शंभर टक्के यशस्वी झाले असे म्हणता येईल. यासाठी परिश्रम घेणाऱ्या सर्व पोलीस अधिकारी आणि अंमलदारांचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी अभिनंदन केले आहे.

# आरोपींच्या अटकेसाठी वैद्यकीन्ही, भायाळाचे ग्रामस्थ रस्त्यावर

## टोलनाक्याजवळ एक तास रास्ता रोको आंदोलन, वाहतूक ठप्प





पाटोदा । प्रतिनिधी

मोटारसायकलवर जाणाऱ्या तिघा जणांना २० ते २५ जणांनी परवा रात्री बेदमपणे मारहाण करून गंभीररित्या जखमी केले होते. या घटनेचे आज तिव्र पडसाद उमटले असून या प्रकरणातील आरोपींविरोधात कठोर कावाई करण्यात यावी या मागणीसाठी भायाळा, वैद्यकिन्हीचे ग्रामस्थ रस्त्यावर उतरले. जवळपास एकतास रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनामुळे रस्त्यावरील वाहतूक काही वेळ ठप्प झाली होती.

परवा रात्री महादेव राख, योगेश राख यांच्यासह अन्य काही जण मोटारसायकलवर जात होते. त्यांना वैद्यकीन्हीच्या रस्त्यावर अडवून बेदमपणे मारहाण दोन दिवसांपूर्वी मोटारसायकलवर जाणाऱ्या तिघांना करण्यात आली होती बेदम मारहाण

करण्यात आली. ही मारहाण राहूल शिंदे, अशोक शिंदे यांच्यासह २० ते २५ जणांनी केली. सदरील आरोपींविरोधात कठोर ◀◀ पान २ वर

# आबा आणि दादांच्या नेतृत्वाखाली शहराच्या विकासाचे नवे पर्व सुरू

## गेवराईकरांच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही –बाळराजे पवार



गेवराई । प्रतिनिधी

विश्वास खूप मोठी आणि जबाबदारीची गोष्ट असून, शहरातल्या नागरिकांनी मोठा विश्वास दाखवला आहे. हा विश्वास जाती – पातीच्या भिंती भेदून विकासाचा मार्ग दाखवणारा असून, गेवराईच्या मतदारांनी टाकलेल्या विश्वासाला कदापी तडा जाऊ देणार नाही. असे प्रतिपादन भारतीय जनता पक्षाचे नेते बाळराजे पवार यांनी येथे केले. गेवराई शहराने कौल दिला. शहाराच्या सर्वांगीण विकासात आम्ही कमी पडणार नाही.

आता, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत विजय मिळवून इतिहास करू, दादा-आबांच्या नेतृत्वाला बळ देण्यासाठी सज्ज व्हा,असे आवाहन माजी मंत्री बदामराव पंडित यांनी येथे बोलताना केले आहे.गेवराई नगरपरिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. गीताभाभी पवार यांचा पदग्रहण समारंभ गुरुवार दि. १ जानेवारी २०२६ रोजी नगर परिषद कार्यालय, येथे मोठ्या उत्साहात पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी मंत्री बदामराव पंडित, मुख्याधिकारी विक्रम महाडूरके, माजी सभापती युध्दाजित पंडित, रोहित पंडित, नानी मोटे, अमोल करांडे, भाजपाचे नेते श्रीकांत सानप, शिवराज पवार, ज्येष्ठ नगरसेवक राजेंद्र राक्षसभुवनकर, माजी नगराध्यक्ष सुशिल जवंजाळ, आदित्य बाळराजे पवार, दादासाहेब गिरी, ◀◀ पान २ वर

# एक हजाराची लाच स्विकारणाऱ्या पाटोदा वन कार्यालयातील वनरक्षकाला बीडमधून अटक

पाटोदा । प्रतिनिधी

नवीन वर्षाच्या पूर्वसंध्येला बीडमध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मोठी कारवाई केली आहे. शेतातील तोडलेल्या झाडांच्या वाहतुकीसाठी एक हजार रुपयांची लाच स्वीकारणाऱ्या पाटोदा वन परिक्षेत्र कार्यालयातील वनरक्षकाला बीडमधून अटक करण्यात आली आहे. दादासाहेब तेजराव येदमल असे अटक करण्यात आलेल्या वनरक्षकाचे नाव आहे.

तक्रारदार शेतकरी आपल्या शेतातून तोडलेल्या वृक्षांची वाहतूक करत होते. ही वाहतूक सुरळीत होऊ देण्यासाठी वनरक्षक दादासाहेब येदमल याने प्रत्येक खेपेसाठी १ हजार रुपये याप्रमाणे लाचेची मागणी केली होती. लाच स्वीकारताना आपण पकडले जाऊ नये, यासाठी येदमल याने एक शक्कल लढवली. त्याने ही रक्कम स्वतः न स्वीकारता, बीड-रायमोहा फाट्यावरील एका हॉटेलमध्ये काम करणाऱ्या दिगांबर चौधरी याच्याकडे देण्यास सांगितले. तक्रारदाराने लाचेची रक्कम हॉटेल कामगाराकडे सुपुर्द केल्यानंतर याची माहिती येदमल याला दिली. मात्र, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने आधीच या प्रकरणाचा सापळा रचला होता. हॉटेल कामगाराने पैसे स्वीकारल्याचे निष्पन्न होताच, एसीबीच्या पथकाने थेट बीड शहरातील संत भगवानबाबा चौक परिसरातील येदमल याच्या घरातून त्याला ताब्यात घेतले.

ही यशस्वी कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे उपअधीक्षक सोपान चिट्टमपल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली अमोल खरसाडे, प्रदीप सुरवसे, अंबादास पुरी, मच्छिंद्र बीडकर यांनी केली

वर्षभराच्या शेवटच्या दिवशी वनविभागाच्या कर्मचाऱ्यावर झालेली ही कारवाई शासकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरली असून, यामुळे भ्रष्ट अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

# घरकुल योजनेचे प्रलंबीत हप्ते लाभार्थींना तात्काळ द्या - सौदागर

## पालकमंत्री अजित पवार यांना दिले निवेदन

**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील प्रधानमंत्री आवास योजना व रमाई आवास घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांच्या समस्येकडे लक्ष कोणीही द्याला तयार नाही पाच महिने पासुन घरकुल आलेल्या लाभार्थी यांना सत्तर हजाराचा हफ्ता पडला नाही अनेक गरजु कुटूंबाची घरकुलांची कामे निधी अभावी रखडलेली आहे. तलवाडा येथील अनेक लाभार्थ्यांनी त्यांच्या घरकुलांची बांधकामे सुरू केली आहेत. परंतू पुढील हप्ते वेळेवर न मिळाल्याने बांधकामे अर्धवट अवस्थेत आहे. या साठी

पालकमंत्री अजित पवार यांनी संबंधीत विभागाला आदेशीत करून घरकुल लाभार्थ्यांच्या खात्यावर निधी जमा करून घरकुल लाभार्थ्यांना न्याय द्यावा, इंजिनिअर कडे गेले असता इंजिनियर सांगतात की आमच्याकडून ऑनलाईन झाले आहे . बिडिओ कडे गेले तर ते सांगतात की आम्ही प्रयत्न करत आहोत परंतु नेमकं जावा कोणाकडे अशी पंचायत पडली आहे. लाभार्थ्यांचे खात्यावर पैसे का पडाना याचा सुद्धा ताळमेळ लागाना गोरगरिबांना न्याय कोण मिळवून देणारे या समस्या कडे सर्व नागरिकांचे लक्ष लागलेले आहे. यासाठी आज दिनांक एक रोजी बीड येथे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार आले असता त्यांना लाभार्थ्यांच्या खात्यावर तात्काळ पैसे टाकण्यात यावे व अधिकाऱ्यांना आदेशित करण्यात यावे यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सेवा दल तालुकाध्यक्ष आक्रम सौदागर यांनी निवेदनाद्वारे केली मागणी

# ऑपरेशन न्यू इयर अंतर्गत धारूरमध्ये गुटखा व अवैध दारूवर पोलिसांची धाडसी कारवाई

किल्ले धारूर । प्रतिनिधी

गोपनीय माहितीच्या आधारे मिळालेल्या माहितीवरून धारूर येथील सपना बियर बार च्या जागेत असलेल्या एका दुकानात गुटखा व पाठीमागे असलेल्या गोडाऊनमध्ये अवैध रित्या विक्री करण्यासाठी आणलेली दारू सहाय्यक पोलीस निरीक्षक केज व धारूर पोलिस यांच्या वतीने संयुक्त रित्या दहाड टाकून पकडण्यात आली आहे. या कारवाईत मोठ्या प्रमाणावर गुटखा व दारू सापडली असून गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे. पोलिसाच्या या कारवाईने अवैधरीत्या गुटखा व दारू विक्री करणाऱ्याचे धाबे दणाणले आहेत.



जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्या वतीने राबविण्यात येत असलेले ऑपरेशन हॅपी न्यू इयर या ऑपरेशन अंतर्गत धारूर शहरांमध्ये आडस रोड येथे असलेल्या सपना बार अँड रेस्टॉरंट येथे सहाय्यक पोलीस निरीक्षक केज व धारूर पोलीस यांच्या वतीने संयुक्तरित्या धाड टाकून अवैधरित्या साठवलेल्या दारूवर आणि गुटख्यावर कार्यवाही करण्यात आली असून टाकण्यात आलेल्या धाडीमध्ये जवळपास ८ लाख ४२ हजार रुपयाचा गुटखा व दारू या ठिकाणी पोलिसांना मिळून आला आहे. तसेच दारू आणण्यासाठी वापरण्यात आलेली गाडी व एक आरोपी ताब्यात घेतला असून उर्वरित आरोपींचा तपास घेतला जात आहे तसेच गुन्हा नोंद करण्याची पुढील प्रक्रिया सुरू असून पोलिसांच्या या धाडसी कारवाईने अवैधरित्या दारू व गुटखा विक्री करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

# हातभट्टी दारूचा चोरटा व्यापार करणाऱ्या इसमाची हर्सुल कारागृहात रवानगी

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या आदेशावरून माजलगाव शहर पोलीस ठाणे अंतर्गत हातभट्टीची दारू तयार करून तिचा चोरटा व्यापार करणाऱ्या एका इसमाला एम.पी.डी.ए.कायद्या अंतर्गत स्थानबद्ध करून त्याची रवानगी हरसुल कारागृहात करण्यात आली. माजलगाव पोलिसांनी भगवान मेंडके याला पोलीस बंदोबस्तात एक जानेवारी रोजी हरसुल कारागृहात स्थानबद्ध केले.

बीड जिल्ह्यामध्ये कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत हे विशेष प्रयत्न करीत असून जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची त्यांना खंबीर साथ लाभत आहे. जिल्ह्यातील गुन्हेगारीचे समूळ उच्चाटन करण्यासाठी कारवाईचा धडाका चालूच असून माजलगाव शहरातील भगवान कटाळू मेंडके रा. शिवाजीनगर, माजलगाव हा हातभट्टीची दारू तयार करून त्याचा चोरट्या विक्रीचा व्यवसाय करत होता. त्याच्यावर दहा गुन्ह्याची नोंद करण्यात आली होती. त्यापैकी आठ गुन्हे न्यायप्रविष्ठ आणि दोन गुन्हे तपासावर आहेत.त्याच्यावर पोलिसांची करडी नजर होती. मात्र तरीही नजर चुकवून हातभट्टी दारूचा चोरटा व्यवसाय तो करत होता. त्याच्यावर कलम ९३ प्रमाणे प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती. मात्र या कारवाईला तो जुमानत नव्हता. शेवटी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत आणि जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी ३१ डिसेंबर २०२५ रोजी त्याच्या विरोधात एमपीडीए कायदे अंतर्गत आदेश पारित करून त्याला स्थानबद्ध करण्याचे आदेश दिले. माजलगाव पोलिसांनी भगवान मेंडके याला दि. ३१ डिसेंबर रोजी रात्री ताब्यात घेतले. त्यानंतर त्याची वैद्यकीय तपासणी करून एक जानेवारी रोजी पोलीस बंदोबस्तात त्याची हर्सूल कारागृहात रवानगी करण्यात आली. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अंबाजोगाईच्या अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, उपविभागीय पोलीस अधिकारी शैलेश गायकवाड, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ, सपोनी प्रल्हाद मुंडे व पोउपनि माखणे ,पोह. महादेव बहिरवाळ, राम भंडाणे यांच्यासह सपोउपनि अभिमान औताडे, गोविंद राख, बिबीशन चव्हाण यांनी केली. या प्रकारामुळे अवैध दारू विक्री, गुटखा विक्री यावर मोठ्या प्रमाणात आळा बसला असून यापुढेही अशा कारवाया चालूच राहतील. असे पोलिसांकडून सांगण्यात आले.

# कल्याण-लातूर द्रुतगती महामार्ग बीड जिल्ह्यातूनच व्हावा -अनिल जगताप

बीड । प्रतिनिधी

प्रस्तावित मुंबई-हैदराबाद (कल्याण-लातूर) जनकल्याण द्रुतगती महामार्ग हा मूळ आराखड्यानुसारच बीड जिल्ह्यातून व बीड शहराच्या जवळून राबवावा, अशी ठाम मागणी शिवसेनेचे बीड जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी केली आहे. याबाबत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांना सविस्तर निवेदन दिले आहे.

नुकत्याच नागपूर येथे पार पडलेल्या राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात मुंबई-हैदराबाद (कल्याण-लातूर) या महत्त्वाकांक्षी द्रुतगती महामार्गाची घोषणा करण्यात आली. या प्रकल्पाच्या मूळ संकल्पनेनुसार लातूर-अंबाजोगाई-धारूर/केज-बीड-पाटोदा/



जामखेड-आष्टी/कडा-अहिल्यानगर मार्गे कल्याण/बदलापूर असा मार्ग प्रस्तावित असून, तो बीड जिल्ह्यातून जाणे अपेक्षित असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

हा महामार्ग केवळ दळणवळणाचा मार्ग नसून बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाचा कणा ठरणार असल्याचे जगताप यांनी स्पष्ट केले. बीड जिल्ह्यातील दूध, सीताफळ, लिंबू, सोयाबीनसह नाशवंत शेतीमालाला जलद बाजारपेठ उपलब्ध होण्यासाठी हा महामार्ग अत्यंत उपयुक्त ठरेल. मुंबई, पुणे, कल्याण तसेच जेएनपीटीमार्गे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठांशी थेट संपर्क साधला जाऊन शेतकऱ्यांचा वाहतूक खर्च, वेळ व इंधन बचत होईल, असा दावा निवेदनात करण्यात आला आहे. तसेच महामार्गालगत औद्योगिक वसाहती, गोदामे, प्रक्रिया उद्योग, लॉजिस्टिक हब उभारणीला चालना मिळून हजारो युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. दुष्काळ, शेतकरी आत्महत्या, बेरोजगारी व स्थलांतराच्या समस्यांनी ग्रस्त असलेल्या बीड जिल्ह्यासाठी हा प्रकल्प विकासाची मोठी संधी असल्याचेही निवेदनात नमूद ◀◀ पान २ वर

# ग्रामीण भागातील शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणारे कृषी प्रदर्शन शेतकऱ्यांसाठी लाभदायक -बाबुराव बोत्रे

## गेवराई येथील राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे विविध मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन संपन्न

**गेवराई । प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना आधुनिक व नाविन्यपूर्ण कृषी तंत्रज्ञानाची माहिती मिळावी, त्यांच्या शेतीत उत्पादन वाढावे आणि आर्थिक उन्नती साधता यावी या उद्देशाने महेश बेदरे यांनी सुरू केलेले कृषी प्रदर्शन शेतकऱ्यांसाठी अत्यंत लाभदायक ठरणार आहे, असे प्रतिपादन ओंकार उद्योग समूहाचे चेअरमन तथा साखरसाम्राट बाबुराव बोत्रे



पाटील यांनी केले.

ते गेवराई येथे आयोजित राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी मंत्री बदामरावजी आबा पंडित, भाजप नेते बाळराजे पवार, युवा नेते युध्दाजित पंडित, तालुका कृषी अधिकारी गिरी, माजी जि.प. सदस्य बप्पासाहेब तळेकर, कृषी उद्यान पंडित, राजेंद्र आतकरे, युवा नेते राजेंद्र मोटे, अजय दाभाडे, अमोल करांडे, मधुकर तौर, बाळासाहेब सानप, भागवत जाधव, विनोद नरसाळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना साखरसाम्राट बाबुराव बोत्रे पाटील म्हणाले की, आज अनेक परदेशांमध्ये शेती तंत्रज्ञान प्रचंड वेगाने विकसित झाले असून आधुनिक यंत्रणा, डिजिटल प्रणाली व संशोधनाच्या आधारे त्यांनी शेती क्षेत्रात मोठी झेप घेतली आहे. ◀◀ पान २ वर

# नवनिर्वाचित नगराध्यक्ष बाळासाहेब जाधव यांचा पदग्रहण सोहळा मोठ्या उत्साहात पडला पार

किल्ले धारूर । प्रतिनिधी

नुकत्याच पार पडलेल्या नगरपरिषद निवडणुकीमध्ये किल्ले धारूर नगर परिषदेवर राष्ट्रवादी काँग्रेसने विजय मिळवला यामध्ये नगराध्यक्ष म्हणून निवडून आलेले बाळासाहेब जाधव यांचा पदग्रहण सोहळा नगर परिषदेत दि.०१ जानेवारी रोजी नऊ वर्षाच्या मुहूर्तावर शहरातील नागरिकाच्या उपस्थित उत्साहात पार पडला.



यावेळी राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते राजभाऊ मुंडे, माजी नगराध्यक्ष शेषराव फावडे, गावातील ज्येष्ठ प्रमोदकुमार तिवारी, माजी नगरसेवक दिनेशसिंह हजारी, राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष महादेव शिनगारे, माझी गटनेते सुधीर शिनगारे,राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष अमोल जगताप, शहराध्यक्ष डॉ. मयूर सावंत,न.प. गटनेते नितीन शिनगारे, नवनिर्वाचित नगरसेवक लक्ष्मण सिरसट ,अवेज कुरेशी, सय्यद हरून, सय्यद शाकेर ,गणेश सावंत, संगीताताई भावटणकर, सुप्रियाताई जाधव, अश्विनीताई गायके, डॉ. आकांक्षा फावडे,रितूताई वैरागे, शेख गफार, चोकाराम गायसमुद्रे,कृष्णा ◀◀ पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

शुक्रवार दि.०२ जानेवारी २०२६ । पान ७

# भाजपने खातं खोललं, पिंपरी चिंचवडमध्ये अजित पवारांना 'दे धक्का'; रवी लांडगे सलग दुसऱ्यांदा बिनविरोध





## महेश लांडगेंकडून सर्वांचे आभार

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी भोसरीसह शहरातील गावकी-भावकी एक राहिली पाहिजे. त्यासाठी शक्य त्या ठिकाणी राजकीय हेवे-दावे बाजूला ठेवून शहराच्या विकासासाठी एकत्रितपणे काम करा, असा संदेश दिला होता. त्यानंतर, रवि लांडगे यांचा प्रवेश आणि पुन्हा बिनविरोध निवड होत असताना आम्हाला विशेष आनंद होत आहे, असे आमदार महेश लांडगे यांनी म्हटलं आहे. तसेच, शहराचे नेते स्व. अंकुशराव लांडगे यांना २०१७ आणि आता २०२६ मध्ये बिनविरोध निवडीच्या निर्णयाने विधायक आदरांजली ठरणार आहे. भाजपासह मित्र पक्ष व समविचारी संस्था- संघटनांच्या कार्यकर्त्यांनी याकामी पुढाकार घेतला. त्या सर्वांची मी आभार व्यक्त करतो. तसेच, शहरातील हा पहिला विजय तमाम पिंपरी-चिंचवडकरांना आणि शहराच्या विकासात योगदान देणाऱ्या स्वाभिमानी भूमिपुत्रांना समर्पित करतो, असेही त्यांनी म्हटले

**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी**

राज्यात महापालिका निवडणुकांमध्ये बिनविरोध निवड होण्यात महायुतीने आघाडी घेतली असून सर्वाधिक उमेदवार भाजपचे निवडून आले आहेत. उमेवारी अर्ज छाननीनंतर आज आणखी काही उमेदवारांना अर्ज माघारी घेतल्याने भाजप-शिवसेना महायुतीच्या उमेदवारांना फायदा झाल्याचं दिसून येत आहे. भाजपने (इगझ) आत्तापर्यंत ११ उमेदवार बिनविरोध केले होते, आता त्यात आणखी एक भर पडली असून भाजपचा १२ वा उमेदवार पिंपरी चिंचवडमधून (झींपश) बिनविरोध निवडून आला आहे. भोसरी मतदारसंघातील प्रभाग ६ ब मधून भाजपचे रवि लांडगे बिनविरोध झाले आहेत.

पिंपरी चिंचवडमध्ये भाजपने खाते उघडल असून रवी लांडगे हे बिनविरोध झाले आहेत. विशेष म्हणजे २०१७ ला भाजपने राष्ट्रवादीचा बालेकिल्ला नेस्तनाबूत केला होता, त्यावेळीही रवी लांडगे यांनी भाजपचं खातं उघडलं होतं. आता पुन्हा एकदा रवी लांडगे बिनविरोध झाले आहेत. ते प्रभाग ६ मधील ब जागेवर नशीब आजमावत होते. येथे, अजित पवार राष्ट्रवादीचे निलेश सूर्यवंशी यांच्या ओबीसी प्रमाणपत्रावर आक्षेप घेतल्यानं, त्यांचा अर्ज बाद करण्यात आला होता. त्यानंतर अपक्ष म्हणून दोन अर्ज उरले होते. त्यात रवी यांच्या पत्नी श्रद्धा लांडगे यांचा एक आणि प्रसाद ताठे यांचा दुसरा अर्ज होता. पत्नी तर माघार घेणार होत्याचं, प्रश्न ताठे यांचा होता. लांडगे यांनी त्यांची मनधरणी केली अन् ताठे यांनीही निवडणुकीत माघार घेतली. त्यामुळे रवी लांडगे सलग दुसऱ्यांदा बिनविरोध झाले आहेत. आता, त्यांच्या विजयाची केवळ घोषणा बाकी आहे. त्यामुळेच, आमदार महेश लांडगेंसह भाजप समर्थकांनी जल्लोष केला. दरम्यान, आपल्यावर कोणाचाही दबाव नव्हता, मी केवळ भाऊंच्या विचारांना पाठिंबा देण्यासाठी प्रभागाच्या विकासासाठी माझा अर्ज माघारी घेत आहे, असे अपक्ष उमेदवार प्रसाद ताठे यांनी म्हटलं.

# पतीने झोपेचे सोंग केल्याच्या वादातून पत्नीने चेहऱ्यावर टाकला उकळता चहा

**पुणे । प्रतिनिधी**

कौटूंबिक कारणातून झालेल्या वादात पत्नीने पतीच्या चेहऱ्यावर उकळता चहा टाकल्याची घटना कोथरूड भागात घडली. याप्रकरणी पत्नीच्या विरुद्ध कोथरूड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



याबाबत एका २७ वर्षीय तरुणाने कोथरूड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार, आरोपी २३ वर्षीय पत्नीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना बुधवारी (दि.३१) सकाळी साडे दहा वाजताच्या सुमारास वसंतनगर कोथरुड परिसरात घडली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी तरुणीचा फिर्यादी तरुणासोबत दोन वर्षांपूर्वी विवाह झाला आहे. पती खासगी ठिकाणी सुरक्षारक म्हणून नोकरी करत आहे. तो आणि त्याची पत्नी वसंतनगर कोथरुड भागात राहायला आहेत. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यात कौटुंबिक कारणावरुन वाद सुरू होते. बुधवारी (३१ डिसेंबर) सकाळी फिर्यादी तरुण झोपला होता. सकाळी साडेदहाच्या सुमारास पत्नीने पतीला झोपेतून उठवले. पतीने झोपेचे सोंग केल्याचा आरोप तिने केला .त्यावरून दोघांमध्ये किरकोळ कारणावरुन वाद झाला. वादातून तिने गॅसवर ठेवलेला उकळता चहा पतीच्या चेहऱ्यावर टाकला. या घटनेत तरुणाच्या चेहऱ्याला दुखापत झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. पोलीस हवालदार एम. जी. दळवी तपास करत आहेत.

# जीवघेणी बेकायदेशीर ऊस वाहतूक कधी थांबणार; डिसेंबर महिन्यात दोन महिलांचा मृत्यू; धनगरवाडी येथे रास्ता रोको आंदोलन!

**नारायणगाव । प्रतिनिधी**

वाहतूक नियमांचे उल्लंघन करून ट्रक व ट्रॅक्टरला जोडलेल्या दोन ट्रॉल्यात प्रमाणापेक्षा जास्त ऊस भरून असुरक्षित केली जाणारी उसाची वाहतूक जीवघेणी ठरत आहे. त्या मध्ये नादुरुस्त रस्त्यांची भर पडली आहे.यामुळे डिसेंबर महिन्यात दोन महिलांचा नाहक मृत्यू झाला असून एक महिला व दोन मुले गंभीर जखमी झाली आहेत.जीवघेणी बेकायदेशीर ऊस वाहतूक थांबवण्यासाठी सहकारी साखर प्रशासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे येथील क्षेत्रीय परिवहन कार्यालयाचे अधिकारी यांनी कार्यवाही करावी.



अशी मागणी धनगरवाडीचे सरपंच महेश शेळके यांनी केली आहे. आज सकाळी नारायणगाव ओझर रस्त्यावरून मॉर्निंग वॉक साठी निघालेल्या दोन पादचारी महिलांना ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर ट्रॉलीने मागून धडक दिली. या अपघातात आशा नामदेव शेळके यांचा जागीच मृत्यू झाला तर कौशल्य भागुजी बेनके या गंभीर जखमी झाल्या. या घटनेच्या निषेधार्थ धनगरवाडी ग्रामस्थांनी नारायणगाव ओझर रस्त्यावर रास्ता रोको आंदोलन केले. या वेळी विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष सत्यशील शेरकर, फौजदार जगदेव पाटील यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सरपंच महेश शेळके म्हणाले १५ डिसेंबर २०२५ रोजी नारायणगाव ओझर रस्त्यावर ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रकच्या मागील चाका खाली सापडून मनीषा तानाजी भोर (४५ रा. हिवरे तर्फे नारायणगाव,ता. जुन्नर ) या महिलेचा मृत्यू झाला होता. त्यानंतर धनगरवाडी येथे ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रक खाली सापडून दोन अल्पवयीन मुले गंभीर जखमी झाली होती. या घटना ताज्या असतानाच आज आशा शेळके यांचा मृत्यू झाला. सध्या जुन्नर तालुक्यातील विविध रस्त्यावरून विघ्नहर व भीमाशंकर सहकारी साखर कारखान्या कडे नियमांचे उल्लंघन करून ट्रॅक्टरला जोडलेल्या दोन ट्रॉल्याद्वारे अतिशय धोकादायक पद्धतीने प्रमाणापेक्षा जास्त ऊस वाहतूक केली जाते. काही ट्रॅक्टरच्या हेडलाईट नादुरुस्त असतात, ट्रॉल्यांना रिफ्लेक्टर बसवलेले नसतात, ट्रॅक्टर चालवण्याचे काम अल्पवयीन मुले करतात, चालकांकडे वाहतूक परवाना आहे किंवा नाही याची खात्री केली जात नाही. ट्रॅक्टरची देखभाल केलेली नसल्याने ब्रेक दाबला तरी वाहने थांबत नाहीत. बहुतेक ट्रॅक्टर मध्ये साऊंड सिस्टिम द्वारे मोठ्या आवाजात गाणी वाजवली जातात. काही ट्रॅक्टर चालक मद्यपान करून किंवा गुटखा चघळत वाहन चालवतात. याकडे पुणे येथील क्षेत्रीय परिवहन कार्यालयाचे अधिकारी का दुर्लक्ष करतात हा प्रश्न निर्माण होत आहे. कारखाना प्रशासन सुद्धा याकडे गांभीर्याने पाहत नाही.यामुळे माणसाचा जीव स्वस्त झाला आहे का असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# शालेय शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांचे १९ जानेवारीपासून बेमुदत कामबंद आंदोलन

**पुणे । प्रतिनिधी**

झींपश पशुी : शालेय शिक्षण विभागीतील अधिकाऱ्यांच्या विना चौकशी व विनापरवानगी सुरू झालेल्या अटक सत्रामुळे सर्व अधिकारी प्रचंड दबावाखाली काम करत असून या कारवायांमुळे अधिकाऱ्यांचे मनोबलाचे खच्चीकरण होत असून कार्यालयीन कामकाजावर त्याचा विपरित परिणाम होत आहे.

गहविभागाने तात्काळ या बेलगाम सुरु असलेल्या अटक सत्रांचा फेरविचार करून, दोष सिद्ध होईपर्यंत अधिकाऱ्यांना संरक्षण देण्याची स्पष्ट धोरणात्मक भूमिका जाहीर करावी अन्यथा अखिल महाराष्ट्र राज्य शिक्षण सेवा राजपत्रित अधिकारी संघटना येत्या १९ जानेवारीपासून बेमुदत कामबंद आंदोलन करणार आहे. शालेय शिक्षण विभागात विना चौकशी अटक सत्र व वेतन देयकांवर प्रतिस्वाक्षरी केली म्हणून अटक करण्याची कार्यवाही नागपूर विभागात सुरू झाली होती. त्यामुळे संघटनेने ऑगस्ट २०२५ मध्ये सामूहिक रजा व काम बंद आंदोलन सुरू केले होते. या अनुषंगाने शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे व प्रधान सचिव रणजीतसिंह देओल यांच्या समवेत संघटनेच्या पदाधिकारी शिष्टमंडळ यांची बैठकही त्यावेळी मंत्रालयात संपन्न झाली होती.

त्या बैठकीमध्ये चौकशी शिवाय कोणालाही अटक होणार नाही तसेच केवळ एकत्रित वेतन



देयका वर प्रतिस्वाक्षरी केली म्हणून अटक होणार नाही याबाबत काळजी घेतली जाईल व संघटनेचे निवेदन संबंधितांना पाठविण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले होते. प्रत्यक्षात मात्र त्याची अंमलबजावणी झालीच नाही. त्यामुळे अधिकाऱ्यांकडून अटक सतराचा निषेध करत संताप व्यक्त करण्यात येत आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले निर्देश विचारात घेता नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वाने सुनावणीची संधी आणि दस्तऐवज सादर करण्यास पुरेसा कालावधी देऊन योग्य तो निर्णय घ्यावा. नियम, कायदे व नैसर्गिक न्यायाच्या तत्वांना डावलून होणाऱ्या पोलीस विभागाच्या कारवाया अधिकाऱ्यांचे मनोबल खच्चीकरण करणाऱ्या आहेत. आतापर्यंत अटक झालेल्या कोणत्याही अधिकाऱ्यांना विभागाने त्यांची विभागीय चौकशी करून दोषी ठरविलेले नाही. त्यामुळे अधिका-यांकडून संतप्त भावना व्यक्त केल्या जात आहेत. संघटनेच्या मागण्या मान्य होई पर्यंत खाजगी शाळांच्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या वेतन देयकावर प्रतिस्वाक्षरी न करण्याबाबत ठाम भूमिका अधिकाऱ्यांनी घेतली आहे.अखिल महाराष्ट्र राज्य शिक्षण सेवा राजपत्रित अधिकारी संघटनेने विविध मागण्यांची दखल घेण्याबाबतचे निवेदन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, शालेय शिक्षणमंत्री, मुख्य सचिव, प्रधान सचिव, शिक्षण आयुक्त यांना पाठविले आहे.

# ट्रिपल सीटवर कारवाई केल्याने वाहतूक पोलिस हवालदारावर हल्ला; तिघे अटकेत

**पुणे । प्रतिनिधी**

दुचाकीवर दंडात्मक कारवाई केल्याने सराइतांनी वाहतूक शाखेतील पोलिस हवालदाराला मारहाण केल्याची घटना सिंहगड रस्त्यावरील धायरी फाटा चौकात घडली. याप्रकरणी पोलिसांनी तिघांविरुद्ध शासकीय कामात अडथळा आणणे, मारहाण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली.





लकी गौरव आनंद (वय २१), साहिल प्रकाश चिकणे, श्रावण रमेश हिरवे अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. याबाबत पोलिस हवालदार संदेश राजेंद्रसिंह सेंगर (वय. ४८) यांनी नऱ्हे पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, पोलिस हवालदार सेंगर हे सिंहगड रस्ता वाहतूक शाखेत नियुक्तीस आहेत. आरोपी आनंद, चिकणे, हिरवे हे दुचाकीवरून धायरी फाटा चौकातून सायंकाळी साडेपाच वाजेच्या सुमारास ट्रिपल सीट जात असल्याने पोलिस हवालदार सेंगर यांनी त्यांना अडवले. वाहतूक नियमाचे उल्लंघन केल्याप्रकरणी सेंगर यांनी दंडात्मक कारवाई केली. त्यामुळे आरोपी चिडले आणि त्यांनी सेंगर यांच्याशी वाद घालण्यास सुरुवात केली. आरोपी हिरवे याने सेंगर यांना चापट मारली. आरोपींनी आरडाओरड करून त्यांचा गणवेश फाडला. शासकीय कामात अडथळा आणणे, मारहाण केल्याप्रकरणी या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपींविरुद्ध यापूर्वी गुन्हे दाखल झाले आहेत, अशी माहिती पोलिसांनी दिली. याप्रकरणी पोलिस उपनिरीक्षक मालुसरे तपास करत आहेत.

# पतीसोबत अनैतिक संबंधांचा संशय, भररस्त्यात महिलेला बेदम मारहाण

**पुणे । प्रतिनिधी**

पतीशी अनैतिक संबंध असल्याच्या संशयावरुन एका महिलेला बेदम मारहाण करुन तिच्या चेहऱ्यावर सिडसदृश द्रवपदार्थ फेकल्याची घटना एनडीए रस्त्यावरील शिवणे भागात घडली.

याप्रकरणी दोन महिलांविरुद्ध गंभीर दुखापत केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका ३५ वर्षीय महिलेने उत्तमनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी महिलेच्या पतीचे एका महिलेशी अनैतिक संबंध असल्याचा संशय होता. त्यानंतर ३० डिसेंबर रोजी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास शिवणे भागात फिर्यादी महिलेला आरोपी महिला आणि तिच्याबरोबर असलेल्या एका महिलेने अडवले. तिला मारहाण करण्यास सुरुवात केली. तिला धक्का दिल्याने ती रस्त्यावर पडली. आरोपीने महिलेने रस्त्यात पडलेला दगड उचलून महिलेच्या चेहऱ्यावर मारला. त्यानंतर महिलेने बाटलीतून सिडसदृश द्रवपदार्थ महिलेच्या चेहऱ्यावर ओतला. द्रवपदार्थ ओतल्याने महिलेचा चेहरा लालसर झाला. पोलीस उपनिरीक्षक लढी तपास करत आहेत.

# लोणी काळभोरमध्ये किरकोळ कारणावरून दोन गटात तुफान हाणामारी; ११ जणांवर गुन्हे दाखल!

**थेऊर । प्रतिनिधी**

लोणी काळभोर येथील इनामदार वस्ती परिसरात किरकोळ कारणावरून दोन गटात शिवीगाळ करून लोखंडी गज व लाकडी दांडक्याने हाणामारी झाल्याची घटना घडली आहे.यामध्ये दोघेजण गंभीर जखमी झाले आहेत.याप्रकरणी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात अकरा जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार सदर घटना लोणी काळभोर बुधवार(३१ डिसेंबर)रोजी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास घडली आहे.शहीदा मुबारक इनामदार (वय ५०,रा. इनामदार वस्ती,बाजारमळा रोड,लोणी काळभोर,ता.हवेली,जि.पुणे) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार मनसुर गनी इनामदार(वय ४५), रिहान मन्सुर इनामदार(वय,२३),जैद मन्सुर इनामदार (वय २५),निहाल खालीद इनामदार (वय २०) व खालीद गनी इनामदार (वय ४५ सर्व रा.इनामदार वस्ती,लोणी काळभोर ता. हवेली जि.पुणे) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तर मनसुर गनी इनामदार यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार हरुन इब्राहिम इनामदार (वय ५०) रेश्मा हरून इनामदार (वय ४५) परवेझ हरुन इनामदार (वय २२),शायरान (वय ५५), शाहरुख नजीर शेख (वय ३०) व करीन इनामदार(वय २६,सर्व रा.इनामदार वस्ती, लोणी काळभोर) यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यांमधील फिर्यादी शहीदा इनामदार यांचा भाचा शाहरुख नजीर शेख याच्या रिक्षाचा धक्का मनसुर गनी इनामदार याच्या मोटार सायकलीस लागला होता.या कारणावरुन आरोपींनी फिर्यादी शहीदा इनामदार यांचा भाचा शाहरुख नजीर शेख,पुतण्या परवेझ हरुण इनामदार व फिर्यादी शहीदा इनामदार यांना शिवीगाळ करुन लाकडी दांडक्याने मारहाण केली.तसेच फिर्यादी शहीदा इनामदार यांचे दिर हरुण इब्राहिम इनामदार यांना निहाल इनामदार याने त्याच्या जवळ असणाऱ्या लोखंडी हत्याराने कपाळावर व पाठीवर मारहाण केली आहे.

# नागरिकांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देऊ- सचिन सातव; नगराध्यक्षपदाचा स्विकारला कार्यभार!

**बारामती । प्रतिनिधी**

शहरातील नागरिकाला सर्वोच्च प्राधान्य देण्याचा प्रयत्न असेल. मुलभूत सुविधा देण्यासोबतच बारामतीचा नावलौकीक वाढविण्यासाठी माझ्यासह सर्व माझे सहकारी नगरसेवक मनापासून काम करु, अशी ग्वाही नवनिर्वाचित नगराध्यक्ष सचिन सातव यांनी दिली. बारामती नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदाचा कार्यभार सचिन सातव यांनी गुरुवारी (ता. १ ) स्विकारला. त्या नंतर आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी ही ग्वाही दिली. या प्रसंगी मुख्याधिकारी पंकज भुसे, सहकारी नगरसेवक उपस्थित होते. सातव कुटुंबिय, अनेक माजी नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष व आजी माजी नगरसेवक उपस्थित होते.



या प्रसंगी बोलताना सचिन सातव म्हणाले, बारामतीला देशातील सर्वात सुंदर शहर करण्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार व खासदार सुनेत्रा पवार यांचे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी आम्ही जिवाचे रान करु. अजितदादांनी जी संधी दिली आहे त्याचे सोने करुन दाखविण्यासाठी पाच वर्ष झटून काम करु.

नागरिकांच्या मुलभूत प्रश्नांना आमचे सर्वाधिक प्राधान्य असेल. स्वच्छता, पुरेसे पिण्याचे पाणी, खड्डेमुक्त रस्ते, नव्याने होत असलेल्या उपनगरात भुयारी गटार योजना, घनकचरा व्यवस्थापन, पार्किंगची समस्या दूर करण्यासह आरोग्य व शिक्षण या मूलभूत सुविधांवर भर देणार आहे. तसेच अधिकाधिक डिजिटल सेवा, पारदर्शक प्रशासन आणि जलद निर्णयप्रक्रियेला आमचे प्राधान्य असेल. समतोल विकास व्हावा हे अजित पवार यांचे स्वप्न असून बहुसंख्य नागरिकांना फायदा होतील अशा योजना प्राधान्याने राबविल्या जातील. बारामती शहर झोपडपट्टीमुक्त करण्याचे अजित पवार यांचे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठीही आम्ही प्रयत्नशील राहू. राष्ट्रीय छात्रसेना, राष्ट्रीय सेवा योजना, स्काऊट गाईड यासह इतर माध्यमातून प्रबोधन व प्रत्यक्ष कामातील सहभाग या माध्यमातून युवकांना सहभागी करुन घेऊ. नगरपरिषद प्रशासनाशी संबंधित महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी आमच्या महिला नगरसेविकांच्या मदतीने प्रत्येक प्रभागात भेटी देत महिलांच्या अडचणी समजून घेत त्यावर कायमस्वरुपी उपाययोजना करण्याचा आमचा प्रयत्न असेल. बारामतीतील प्रत्येक प्रभागात स्वताः फिरुन नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधू. या शिवाय मोबाईल अँपच्या माध्यमातून घरबसल्या अडचणी प्रशासनापर्यंत पोहोचवून त्याचे निराकरण आम्ही ठराविक कालावधीत कसे करु याचा प्रयत्न करणार आहोत.

# नसरापूरजवळ मद्यधुंद कारची धडक; आई-मुलाचा जागीच मृत्यू

**नसरापूर । प्रतिनिधी**

भोरकडून येणाऱ्या भरधाव मद्यधुंद कारचालकाने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या दोघांना जोराची धडक दिली. यामध्ये ते दोघेही जागीच ठार झाले असून, यात आई आणि मुलाचा समावेश आहे. यामुळे तेलवडी गावावर मोठी शोककळा पसरली आहे.

कारमधील तरुण मद्यधुंद होते. या धिंगाणा करणाऱ्या संबंधितांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल होत नाही तोपर्यंत मृतदेह ताब्यात न घेण्याचा पवित्रा ग्रामस्थांनी घेतल्याने रात्री उशिरापर्यंत तणावाचे वातावरण राहिले होते. नंदा लक्ष्मण धावले (वय ५५) आणि अमृत लक्षण धावले (वय २७, रा. तेलवडी, ता. भोर) अशी अपघातात मृत्युमुखी पडलेल्या आई व मुलाचे नावे आहे. ही घटना भोर-कापूरव्होळ रस्त्यावरील कासुर्डी गु. मा. हद्दीत बुधवारी (दि. ३१ डिसेंबर) दुपारी एक वाजण्याच्या सुमारास घडली.

तातडीने ग्रामस्थांनी गंभीर जखमी झालेल्या आई व मुलाला एका खासगी हॉस्पिटलमध्ये उपचारांसाठी दाखल केले. मात्र, उपचारांपूर्वीच दोघेही मृत्युमुखी झाल्याचे डॉ. राजेंद्र डिंबळे यांनी सांगितले. धडक दिल्यानंतर पळून जाणाऱ्या दोघांना





ग्रामस्थांनी पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. मात्र, इतर दोघे फरार झाल्याने घटनास्थळी मोठा असंतोष निर्माण झाला होता. स्वप्निल सुनील पठारे (वय ३७, रा. खराडी पुणे) असे चालक आरोपीचे नाव आहे. नंदा धावले ह्या त्यांचा मुलगा अमृत याच्या दुचाकीवरून शेतात गेल्या होत्या. या वेळी रस्त्यावर दुचाकी लावून शेतात जाण्यासाठी ते उभे होते. इतक्यातच पाठीमागून २०० फूट अंतरापासून सुसाट येणाऱ्या कारने दोघांना उडविले. यात या माय-लेकांचा दुर्दैवी अंत झाला. घटनास्थळी राजगड पोलिसांनी पंचनामा केला असून, कारचालकासह दोघांना ताब्यात घेतले आहे. अधिक माहिती देण्यास पोलिसांनी टाळाटाळ केली आहे.

**पोलिसांच्या दुर्लक्षामुळेच अपघात**

या कारमध्ये (एमएच १२ व्हीएन ०१०१) पठारेसह इतर तीन ते चार जण मद्यधुंद असल्याचे बोलले जात आहे. कारमध्ये दारूच्या बाटल्या, सिगारेट पॉकिटे, ग्लास आढळून आले. ३१ डिसेंबरच्या पार्श्वभूमीवर भोर आणि राजगड पोलिसांनी अलर्ट राहून मद्यप्राशन करणाऱ्या वाहनधारकांची तपासणीसाठी पथके तैनात करणे गरजेचे असताना देखील इतर बंदोबस्ताच्या नावाखाली कानाडोळा केल्याने निष्पाप माय-लेकाचा मृत्यू झाला आहे.